नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या महाराष्ट्र साहित्य पत्रिका ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून महाराष्ट्र साहित्य परिषदेद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

म. सा. पत्रिका

वर्ष ११वे - १९३८.

अं. ४१,४२,४३,४४.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
महाराष्ट्र साहित्य परिषद

२७३०

वर्ष ११वे - १९३८.

अं. ४१-४२-४३-४४.

संपादक - मोहन ज्ञानेश्वर शहाणे

वर्ष ११ वे अंक १ (४१) फेब्रुवारी १९३८

वर्ष ११ वे अंक २रा (४२) एप्रिल १९३८

वर्ष ११वे अंक ३रा (४३) जुलै १९३८

वर्ष ११वे अंक ४था (४४) ऑक्टोबर १९३८

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

महाराष्ट्र साहित्य परिषद

महाराष्ट्र साहित्य परिषद्, पुणें

महाराष्ट्र-साहित्य-पत्रिका

[त्रैमासिक]

४४

संपादक— मोहन ज्ञानेश्वर शहाणे
(सदस्य, सर्व्हंण्टस् ऑफ अिण्डिया सोसायटी)

आश्विन १८६०

वर्ष ११ वें] ऑक्टोबर १९३८ [अंक ४

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

महाराष्ट्र साहित्य परिषद

महाराष्ट्र-साहित्य-पत्रिका

वर्ष ११ वें] **अनुक्रमणिका** [अंक ४ था

विषय	पृष्ठ
१ ज्ञानेश्वरीची राजवाडेप्रत (उत्तरार्धांतील कांही पाठभेद): प्रा. शं. दा. पेंडसे, अेम्. अे.	१६१
२ परीक्षणें (१) छन्दोरचनाः श्री. ना. ग. जोशी	१७८
(२) अर्वाचीन मराठी गद्याची पूर्वपीठिकाः ना. ग. जोशी	१८०
(३) गगनाला गवसणी: श्री. चिं. ग. कर्वे, बी. अे.	१८२
(४) फवारे: प्रा. श्री. नी. चाफेकर, अेम्.अे., अेल्अेल्.बी.	१८३
३ साभार स्वीकार	१८४
४ चर्चा (१) वैनायक-वृत्तविचार: श्री. ना. ग. जोशी	१८५
(२) कुडाळी म्हणी: श्री. वा. रा. प्रभु, बी. अे.	१८७
५ पत्रव्यवहार (कोंकणी-अहिराणीसामिति): श्री. चिं. ग. कर्वे, बी. अे.	१८८
६ संपादकीय	१८९
७ महाराष्ट्र विद्यापीठ	१९१
८ परिषद्वार्ता	१९२

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

महाराष्ट्र साहित्य परिषद

महाराष्ट्र-साहित्य-पत्रिका

म. सा. परिषद् अध्यक्ष श्री. न. चिं. केळकर कार्याध्यक्ष श्री. वा. म. जोशी	या अंकांत स्वाक्षरीने प्रसिद्ध होणाऱ्या कोणत्याहि लेखांतील मतांबद्दल महाराष्ट्र-साहित्य-परिषद् उत्तरदायी नाही. हे लेख चर्चात्मक दृष्टीनेच प्रसिद्ध केले आहेत.	कोषाध्यक्ष श्री. ध. रा. गाडगीळ चिटणीस रा. सा. र. लु. जोशी श्री. ना. के. बेहेरे

वर्ष ११] संपादक — मोहन ज्ञानेश्वर शहाणे [अंक ४

ज्ञानेश्वरीची राजवाडे प्रत

(उत्तरार्धातील कांही पाठभेद)

लेखकः— शं. दा. पेंडसे, नागपूर

ज्ञानेश्वरीची राजवाडे यांनी संपादिलेली व मुकुंदराजी म्हणून संबोधिलेली प्रत, उपलब्ध प्रतींत भाषेच्या दृष्टीने सर्वांत जुनी, अेकनाथपूर्वकालीन व सर्वांत कमी क्षेपक ओव्या असलेली अशी आहे. राजवाड्यांनी मुकुंदराजाशीं लाविलेला तिचा संबंध असिद्ध असल्यामुळे तिला राजवाडे प्रत म्हणणेंच अधिक सयुक्तिक होअील. "मुकुंदराजाची हयात शक ११५८ पासून शक १२५८ पर्यंत होती....ही प्रत मुकुंदराजाची आहे व ही शक १२१२ पासून शक १२४० पर्यंतच्या काळांत केव्हा तरी लिहिलेली आहे"[1] असें राजवाडे म्हणतात. पण मुकुंदराजाच्या या काळाविषयी मतभेद आहे. मुकुंदराज ज्ञानेश्वरानंतर होअून गेले हा पक्ष आता कोणी मानीत नाही. कारण त्यांची गुरुपरंपरा, समाधिस्थान वगैरे गोष्टी आता निश्चित झाल्यामुळे, त्यांचा कालही ज्ञानेश्वरांपूर्वीचा आता ठरला आहे. त्यांच्या विवेकसिंधूच्या कांही पोथ्यांत "शके अकरा दाहोत्तरू। साधारण संवत्सरू" असा काळ दिला आहे. "साधारण संवत्सर शके १११२ ला येतो तथापि शके १११२ च्या सुमारास म्हणजे ज्ञानेश्वरापूर्वी बरोबर १०० वर्षे विवेकसिंधु ग्रंथ रचला गेला असें मानण्यास व मुकुंदराजाकडे मराठींतील आदिकवि हा मान चालू ठेवण्यास कांही प्रत्यवाय नसावा. 'मज श्वासनिमेषाचा श्रम। तेथ कायसा या ग्रंथाचा उद्यम' या ओवीवरून ग्रंथरचनाकाली कवि चांगले ६० वर्षांच्या आंत-

(१) राजवाडे—ज्ञानेश्वरी प्रस्तावना ६८-६९.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
महाराष्ट्र साहित्य परिषद

बाहेर असावेत. हें खरें धरल्यास मुकुंदराजांचा जन्म शके १०५० च्या सुमारास झाला असावा व त्यांचें आयुर्मान शके १०५० ते ११२० पर्यंत धरण्यास हरकत नसावी''[२] असें श्री. पांगारकरांनी ठरविलें आहे. राजवाड्यांची प्रत ''नाथकालीं किंवा फार तर नाथांच्या पूर्वी ५।२५ वर्षें नकलेली असावी''[३] असेंहि मत त्यांनी व्यक्त केलें आहे तें कोणास पटलें नाही तरी, ती राजवाड्यांनी म्हटल्याप्रमाणे मुकुंदराजाच्या हयातींत लिहिली गेली नाही हें मुकुंदराजाच्या काळावरून कोणाच्याहि लक्षांत येईल. पोथीच्या शेवटीं 'सद्‌गुरू मुकुंदेन दत्ता' असा अुल्लेख आहे. पण हा मुकुंद व मुकुंदराज अेकच हें ठरविण्यास कांहीहि आधार नसल्यामुळे राजवाड्यांचें हें अनुमान लटकें पडलें आहे.

राजवाडे प्रतीच्या प्राचीनत्वाविषयी अनेकांनी शंका प्रदर्शित केली आहे. १९३०–३१ सालीं रा. त्रिलोकेकर यांनी 'प्रभुप्रभात' मासिकांत एक मार्मिक लेख लिहून राजवाड्यांची ज्ञानेश्वरीची प्रस्तावना आणि पुढे छापलेली ज्ञानेश्वरी व एक पानाचा फोटो यांतील विसंगति नजरेस आणली होती. ''प्रस्तावनेंत पान ६६ वर ज्ञानेश्वरीच्या शेवटच्या आठ ओव्या अुद्‌धृत केल्या आहेत त्या १७८४ ते १७९१ अशा आहेत. याच्या अुलट पुढें छापलेल्या ज्ञानेश्वरींत याच ओव्या १७८१ ते १७८८ अशा छापल्या आहेत. म्हणजे या अध्यायांतील तीन ओव्या गळल्या असाव्या. प्रस्तावनेंत १३ व्या अध्यायाच्या ११६३ ओव्या दिल्या आहेत तर पुढील पोथींत त्या ११६४ आढळतात. म्हणजे अेक ओवी वाढली. १४व्या च्या, प्रस्तावनेंत ३७१ तर पोथींत ४११ ओव्या आहेत म्हणजे ४० ओव्या वाढल्या. १५ व्याच्या, प्रस्तावनेंत ५९६ तर पोथींत ५६५ ओव्या आहेत म्हणजे ३१ ओव्या कमी झाल्या. तसेंच पुढील १६ व्या आणि १७ व्या अध्यायांत प्रस्तावनेंत दर्शविल्यापेक्षा क्रमाने दोन व अेक ओव्या कमी आहेत. अशा रीतीने अेकंदर ४१ ओव्या वाढल्या व ३७ ओव्या गळल्या व अेकंदर ओवीसंख्या ८८९२ पेक्षा ४ ओव्यांनी वाढली आहे. पोथीचें प्रस्तावनेंत केलेलें वर्णन आणि फोटो यांतहि अनेक प्रकारची विसंगति आहे. प्रस्तावनेंत ''दर पृष्ठास बारापासून चौदापर्यंत ओळी आहेत व प्रत्येक पानाचे चारी कोपरे मुद्दाम वाटोळे केले आहेत'' असें म्हटलें आहे तर फोटोंतल्या पानांत १५ ओळी आहेत व तें पान चौकोनी आहे. तसेंच फोटोंतील पहिल्या ओवीपुढे ९७ चा आंकडा आहे तर पुढील प्रतींत ६९० पानावर तिच्यापुढे ९६ चा आंकडा छापला आहे. 'गती' शब्द फोटोंत दीर्घान्त असतां पुढे ऱ्हस्वान्त छापला आहे. शब्दयोगी अव्ययें मुळांत सलग लिहिलीं असतां पुढे अलग छापलीं आहेत. फोटोंतील 'म्ह' हें अक्षर 'ह्म' असें छापलें आहे''[४] रा. त्रिलोकेकर यांनी दाखविलेली ही विसंगति कोणालाहि मान्य केली पाहिजे. या विसंगतीवरून अेवढेंच ठरेल की ज्ञानेश्वरीची जी पोथी छापली त्या पोथीच्या पानाचा हा फोटो नव्हे. मूळ पोथी नष्ट झाली व दुसऱ्या कोणत्यातरी जुन्या पोथीच्या पानाचा फोटो छापला गेला. या अनुमानाला विरोधी अशी अेकच गोष्ट आहे. ती ही की फोटोंतल्या पानांतील भाषाहि जुनी अेकनाथपूर्वकालीन आहे. पण राजवाड्यांच्या पोथीच्या प्रत्येक पानाचे कोपरे मुद्दाम वाटोळे केले होते व फोटोंतील पान तर चौकोनी आहे त्यामुळे दुसऱ्याच पोथीच्या पानाचा फोटो काढला असावा असें अनुमान काढण्याशिवाय गत्यंतर नाही. या विसंगतीवरून, व पोथींत आलेलें 'कीं' हें अुभयान्वयी अव्यय फारसी आहे अशी कल्पना करून शिवाजी-रामदासांच्या नंतरची ही प्रत

(२) पांगारकर—'मराठी वाङ्मयाचा इतिहास' खंड पान ३९१—९२.
(३) ,, ,, ,, पान ३८३.
(४) खंडेराव सदाशिव त्रिलोकेकर—'अेकनाथ विरुद्ध राजवाडे' प्रभुप्रभात १९३०–३१.

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
महाराष्ट्र साहित्य परिषद

आहे हें त्रिलोकेकरांचें म्हणणें मात्र कोणालाहि मान्य होण्यासारखें नाही. "फारसी अुभयान्वयी अव्ययें ज्या ज्ञानेश्वरकालीन म्हणविणाऱ्या लेखांत येतील तो लेख अर्वाचीन म्हणजे मुसलमानी रियासतींतील समजावा" असें विधान राजवाडे यांनी केलें आहे पण तें अिंग्रजींतील that या अुभयान्वयी अव्ययासारखें फारसींतील जें 'कीं' हें अव्यय आहे त्या संबंधानें केलें आहे.[5] 'तो म्हणाला कीं, मी येणार नाहीं' यांतील 'कीं' हें उभयान्वयी अव्यय राजवाड्यांचें लक्ष्य आहे व हें अव्यय रामदास-शिवाजीनंतर मराठींत रूढ झालें. तत्पूर्वी त्याबद्दल 'जे' 'जें' हें अव्यय योजीत असें त्यांनी म्हटलें आहे. "राजवाड्यांनी कीं या उभयान्वयी अव्ययाबद्दल लिहिलें आहे. रा. त्रिलोकेकरांनी दिलेलीं 'कीं' चीं अुदाहरणें उभयान्वयी अव्ययांची नाहीत" असा अभिप्राय मीं रा. त्रिलोकेकरांच्या लेखमालेंतील या मुद्यासंबंधीं दिला होता. रा. त्रिलोकेकरांचीं 'कीं' चीं अुदाहरणें पादपूरक 'कीं' चीं आहेत असा माझ्या म्हणण्याचा आशय होता. त्यावर त्रिलोकेकरांनी सविस्तर अुत्तर देअून कीं हें अव्यय सर्व व्याकरणकारांनी उभयान्वयी अव्ययाच्याच कोटींत गणलें आहे असें दाखविलें पण त्याजबरोबर 'कीं या अव्ययाचा अुपयोग जुन्या मराठींत केवळ पादपूरणार्थ सुद्धा करीत असत' हेंहि त्यांनीच सोदाहरणें दाखविलें. खरी गोष्ट अशी आहे की, राजवाडे ज्या 'कीं' अव्ययाला फारसी मानतात त्याला तसें मानण्याची सर्वांची तयारी नाही, हें त्रिलोकेकरांनी अुद्धृत केलेल्या व्याकरणकारांच्या मतांवरून दिसून येअील. 'मराठी भाषेचें नवीन व्याकरण' या पुस्तकाचे कर्ते श्री. कृष्णशास्त्री गोडबोले यांनी 'तो म्हणाला कीं मी अुद्यां येअीन' यांतील 'कीं' संस्कृतमधील 'किम्' पासून व्युत्पादिला आहे. बीम्सनेही 'कीं' हें संस्कृतमधील 'किंवा'पासून[7] व्युत्पादिल्याचें त्रिलोकेकरांनीच दाखविलें आहे. राजवाडे म्हणतात त्याप्रमाणे की हें स्वरूपबोधक अुभयान्वयी अव्यय फारसींतून आलें असें मानिलें तरी त्रिलोकेकरांनी दिलेलीं अुदाहरणें या स्वरूपबोधक अव्ययाचीं होअूं शकत नाहीत. तीं पादपूरक किंवा विकल्पदर्शक आणि कांही ठिकाणीं तर दोन वाक्यें किंवा शब्द जोडणारीं ठरतील. 'हों काज सार विजयाचें । किं तें भांडार महातेजाचें । (ज्ञा. १-१३८) किं पाखांचा मेरु जैसा । रहवरु मिरवत तैसा ॥ (१-१३९) या ठिकाणीं कीं हें विकल्पदर्शक आहे, स्वरूपबोधक नाही हें स्पष्ट आहे. 'किं दुःखमिदम्, किं सातमिदम्, किं अुत्कण्ठेयम्, किं व्याधिरियम्, किं व्यसनमिदम्'[8] या ठिकाणी 'किम्'चा जसा विकल्प दर्शक अुपयोग केला आहे त्याच तऱ्हेचा वरील ओवींतील 'कीं'चा अुपयोग आहे. 'विचारीं तूं अर्जुनु । किं कारुण्यें कीजतासि दीनु । सांध पां अंधकारें भानु । ग्रसिला आथी ॥ ज्ञा. २-१३ ॥ या ठिकाणीं कीं हें that या अर्थाचें स्वरूपबोधक अव्यय आहे हें दाखविण्याकरिता "अर्जुना ! विचारीं (विचार कर) किं तूं कारुण्यें दीनु कीजतासि, सांध पां (कीं) अंधकारें भानु ग्रसिला आथी ! असा अन्वय त्रिलोकेकरांनी केला आहे. पण तो संदर्भाला जुळत नाही. अंधार आणि भानु या जशा दोन कोट्या दृष्टान्तांत आहेत त्याचप्रमाणे दार्ष्टान्तिकांतहि पाहिजेत हें लक्षांत घेतलें म्हणजे 'विचारी' असा निरनुनासिक पाठच अधिक योग्य ठरतो व 'अर्जुना तूं विचारी आहेस आणि कारुण्याने दीन केला जातोस ! अंधकाराने भानू कधी ग्रासिला जातो काय ! असा अर्थ निष्पन्न होतो,

(५) राजवाडे 'ज्ञानेश्वरी प्रस्तावना' पान १०५
(६) त्रिलोकेकर—प्रभु प्रभात 'अेकनाथ विरुद्ध राजवाडे' मार्च १९३२.
(७) बीम्स—Comparative grammar Vol. III P. 217.
(८) बाणभट्ट—कादंबरी निर्णयसागर प्रत पान २७७.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
महाराष्ट्र साहित्य परिषद

म कीं हें स्वरूपबोधक उभयान्वयी अव्यय करण्याकरिता अर्थसौन्दर्याची हानि करावी लागत नाही. या ओवीपूर्वीची ११वी आणि १२वी ओवी पाहिली तरी तेथेहि असाच प्रकार आहे. "हें पाहासा तुझेनि पाडें। दीसे त्रैलोक्यही थोकडे। ऐसें पौरुष चोखडें। पार्था तुझें ॥२-११॥ तो तूं कीं आजि येथें। सांडूनिया वीर वृत्तितें। अधोमुख रुदनातें। करीतु आहासि ॥१२॥ "त्रैलोक्यही थिटें पडेल असें तुझें पौरुष (पराक्रम) आहे आणि तो तूं वीर-वृत्ति सांडून रडत आहेस" असा ११ व १२ ओवीचा मिळून अर्थ आहे. १२ ह्या ओवीचा संबंध ११ वी कडे आहे. "तो तूं किं (जो) आजि वीर-वृत्तीतें सांडूनिया येथे अधोमुख रुदनातें करीतु आम्हासि' हा त्रिलोकेकरांनी दिलेला अर्थ बरोबर नाही. कारण त्याने अर्थ अपुरा राहतो. तात्पर्य, की हें फारसी स्वरूपबोधक उभयान्वयी अव्यय राजवाडे-ज्ञानेश्वरींत नाही व त्यामुळे ती रामदास-शिवाजीच्या काळानंतरची त्रिलोकेकर म्हणतात त्याप्रमाणे ठरत नाही. 'कीं या फारसी स्वरुपबोधक उभयान्वयी अव्ययाबद्दल ज्ञानेश्वर 'जें' हेंच जुनें अव्यय वापरतात. उदा :—तरी मागां त्रयोदशीं। अध्याइं गोठि ऐसी। जें श्रीकृष्ण अर्जुनेंसी संवादिले ॥१४-३२॥ जें क्षेत्र क्षेत्रज्ञ योगें। होईजे येणें जगें। आत्मा गुण संगें संसारिया ॥१४-३३॥.

ज्ञानेश्वरीच्या राजवाडे प्रतींतील भाषा एकनाथपूर्वकालीन व ज्ञानेश्वरकालीन आहे हें रा. मोडक व रा. नेने यांनी उदाहरणें देऊन सिद्ध केलें आहे.

(१) जेणें कृतकार्यों मनुष्या मनुष्या होइजे, तिहिं मृत्युलोकीं मनुष्यां होइजे वगैरे उदाहरणांवरून, एकनाथपूर्वकालीं भावे क्रियापदाचें पूरक सानुस्वार आकारान्त होत असे. वच्छहरण या एकनाथपूर्वकालीन महानुभावीय ग्रंथांत 'निरसां होऔनि श्रीकृष्णीं भजिजे' यांतील 'निरसां' हें पूरक असेंच आहे. एकनाथकालीं तें अकारान्त झालें.

(२) मियां हें संस्कृत "मया'शीं जवळ असलेलें रूप राजवाडे प्रतींत आहे. 'म्यां' हें एकनाथकालीन रूप आहे. (३) मनू आपण अनुष्ठिली हें तृतीयेचें रूप. (४) बोलिलां हें आं प्रत्ययान्त प्रथमपुरुषी कर्तरि रूप. (५) तुआंविण हें संस्कृतानुसारीरूप. (६) कलभा, एक एकांतें घरणी, अवस्वरीं वगैरे शब्दरूपें राजवाडे ज्ञानेश्वरीचें एकनाथपूर्वकालीनत्व सुचवितात" असें रा. मोडक यांनी लिहिलें आहे.[९]

"ज्ञानेश्वरीची भाषा म्हणजे काव्यासाठी मुद्दाम 'मशकू, गजु, उपावो, पै' असले शब्द कृत्रिम तऱ्हेने योजून केलेली नसून, सामान्य जनतेच्या प्रत्यक्ष व्यवहाराची तशीच भाषा होती. हें महानुभावीय वाङ्मयांतील उपलब्ध झालेल्या गद्यग्रंथांवरून स्पष्ट सिद्ध होत आहे. एवढेंच नव्हे तर वाक्प्रचार, संप्रदाय, वाक्यरचना, शुद्धलेखनाचे नियम या दृष्टीने महानुभावीय वाङ्मय राजवाडे यांच्या ज्ञानेश्वरींतील भाषेला पुष्टि व पुरवणी देत आहे"[१०] असें रा. नेने यांचें मत आहे.

राजवाडे ज्ञानेश्वरी अशा रीतीने भाषेच्या दृष्टीने प्राचीन असली तरी पाठांच्या दृष्टीने मात्र शुद्ध आहे असें नाही. मूळ पोथी विद्यमान नसल्यामुळे, मूळचे अपपाठ किती व छपाईचे

(९) गो. कृ. मोडक—"राजवाडे ज्ञानेश्वरीचें पुराणत्व" भा. इ. सं. मं. त्रैमासिक वर्ष १५ अंक १ ला.

(१०) ह. ना. नेने—'ज्ञानेश्वरदर्शन'...साहित्य खंड पान ४८ (ज्ञानेश्वरकालीन मराठी व ज्ञानेश्वरीचें व्याकरण),

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
महाराष्ट्र साहित्य परिषद

किती हें सांगतां येत नाही, तथापि ज्ञानेश्वरीचा पूर्वार्ध जितक्या काळजीपूर्वक छापला आहे तितका उत्तरार्ध नाही. त्यामुळे त्यांत बरेच चुकीचे पाठ दिसतात त्यांपैकी कांही चर्चेकरिता येथे उद्धृत करितों.

	अध्याय १० ओवी	राजवाडे	साखरे	माडगांवकर	कुंटे व आठल्ये
(१)	२५५	ओवी पुढील वाक् व स्मृतीचे अर्थ देणाऱ्या दोन ओव्या गळल्या आहेत	या चारही प्रतींत या दोन ओव्या दिल्या आहेत.		
(२)	२६२	मी कार्य अुद्देशां	विजयो मी कार्योद्देशां	—	—*
(३)	२८४	तैसि मज येकाचि	तेविं एकाकियानी	—	मज अेकाची
(४)	३०२	तुवां आरंभलें	तुवां भरलें	—	—
	अध्याय ११ वा				
(५)	१०४	पुत्र पाहातां	पुत्र आळवितां	—	पुत्रा आळवितां
(६)	१०७	तूतें आराधितां नाअिकें	तूतें आराधी ना आयके	—	—
(७)	१३७	तैसें प्रकृतीं	तैसें आकृतीही	—	—
(८)	४११	व्याडिं	सवडी	—	—
(९)	४१४	जन्मलेयानि मोहर	जन्मलयां आन मोहर	—	—
(१०)	४६४	वीराचेनिवार्पे	विराटाचेनि महाभेडें	—	—
(११)	४७७	पूर्ण मनोरथा	अपूर्णमनोरथा	—	—
(१२)	५९०	इंद्रनील	इंद्रनीला	—	—
(१३)	६१०	तिहिं स्वर्ग	तर्पी ऐश्वर्य	—	—
(१४)	६१०	अपटांतरिं	अपारांतरें	—	—
(१५)	६५३	वीरविलासे	वीरविलासें (अर्जुनें)	वीर्यविलासें	—
(१६)	६६१	जाणेयांचा	जिणयाचा	—	—
(१७)	६७६	घारावांचूनि	धरावांचूनि	—	—
(१८)	६८९	जें आहे । तें	जैं जाये तैं	—	—
	अध्याय १२ वा				
(१९)	२९	सवर्म	सकर्म	कर्म	कर्म
(२०)	४९	धैर्यांचे	अधैर्यांचे	—	—
(२१)	२०७	विचारें	विचरे	—	—
(२२)	२३३ व ३४	या ओव्या ३३९ किंवा ४० ओवीनंतर दिल्या पाहिजेत. आगाशे यांच्या लक्षांत हा दोष आलेला नाही	या चारही प्रतींत त्या योग्य जागीं दिल्या आहेत.		

* जेथे — असें चिन्ह दिलें आहे तेथील पाठ साखरेप्रतीप्रमाणे आहे असें समजावें.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
महाराष्ट्र साहित्य परिषद

		अध्याय १५ वा			
(२३)	२७९	आधारें	आंधारें	—	—
		अध्याय ६ वा			
(२४)	७	चोरवेल	चोर वेळ	चोरळी फिटे	चोरळी
(२५)	९	उत्वारीं	उरवरीं	—	—
(२६)	३१	लाघलेति	लाधलों	लाधलां	—
(२७)	५४	नीती	नीकी	—	—
(२८)	५६	ज्ञान	ज्ञाना	ज्ञानीं	ज्ञानीं
(२९)	८३	संयमाग्नीचा	जें योग ज्ञानीच	योग ज्ञानीच	योग ज्ञानीच
(३०)	८६	मानौनि	मनौनि	—	—
(३१)	१०५	ज्ञाने सर्वस्व जाणे	दाने सर्वस्व देणे	—	—
(३२)अ	१०७	सर्व धर्माचेया	स्वरूपाचेया	—	—
(३२)आ	१०७	प्राणें हीं या शरीरा	प्राणेन्द्रियशरीरा	प्राणेद्रियां शरीरा	—
(३३)	११२	दृष्टिचां	भूतीं	—	—
(३४)	१२३	अविचार	अविकार	—	—
(३५)	१२५	चीरी आलेयां	शिरीं हालेयां	—	—
(३६)	१९६	ही ओवी १९३ व्या पुढें पाहिजे	आहे	थोड्या फरकाने योग्य स्थळीं दिली आहे	—
(३७)	२०९	सुत्ति	शुक्ति	—	—
(३८)	२१०	गणराशी	गुणराशी	—	—
(३९)	२१०	शांतिरूप	संपत्तिरूप	—	—
(४०)	२१५	गारा	डांगोरा	—	—
(४१)	२३७	सगलें	जेणे अुजळे	—	—
(४२)	२६५	काय रात्रि चांदिर्णे	रात्रिचा दिवे	—	—
(४३)	२९७	शून्य	पुण्य	—	—
(४४)	३५७	दुसरा चरण तिसरा व तिसरा दुसरा पाहिजे	आहे	—	—
(४५)	३७३	जैत	यजिती	—	—
(४६)	३७९	विसरा	विचारा	विसरा सोवते	—
(४७)	३८२	वेली	वेदी	—	—
(४८)	४२३	भलेया	भलतेया	भलेतया	भलतया
(४९)	४६२	हें वोधेंचि आलें पैसें	हें ओधेंचि आलें आपैसें	बोधेंचि आले आपैसें	—
(५०)	४६५	लोकसंग्रहाची	लोकसंग्रहासी	—	—
(५१)	५५	प्राणियां चांपडे	प्राणियाचां पडे	—	—
(५२)	९४	साचाचि खंडित	साचचि पाखंडाचीं	—	—
(५३)	१२२	देर्णे	तप दान	—	—
(५४)	२०३	आंगपुष्टी	अंगेष्टी	—	—

(५५)	२२७	आशाश	अवकाशु	—	—
(५६)	२३२	लोभलेपणें	लाभलेपणें	ते स्वलाभ लाभलेपणें	तें स्वलाभ लाभलें लाभलेपणें
(५७)	२६०	ही ओवी २६१ वी पाहिजे व २६१ वी तशी आहे २६० पाहिजे		—	—
	अध्याय १७ ओवी	राजवाडे	साखरे	माडगांवकर	कुंटे व आठल्ये
(५८)	२७४	चिंता	वित्ता	—	—
(५९)	२७८	देंदी	नेदी	—	—
(६०)	३०६ वी ओवी ३०७ व ३०७ वी ओवी ३०६ वी पाहिजे		आहे	—	—
(६१)	३२३	त्रिशुद्धीगा	तें वेगळें गा	तें वेगळें आहे	तें वेगळें आहे
(६२)	३३६	जीवें	जीविकें	—	—
(६३)	३४०	उपनिषदातें	उपनिषदाचें	उपनिषदातें	उपनिषद तें
(६४)	३४२	घेओं	लेओं	—	—
(६५)	३४२	बाण	बापा	—	—
(६६)	३४४	नेणति	नेणतां	—	—
(६७)	३५८	निघानी	विधानी	—	—
(६८)	३९०	वेगलेयां	व्यंगलिया	व्यंगले	—
(६९)	४१८	आक्षेपावें	अपेक्षावें	आक्षेपावा	—
	अध्याय १८ वा				
(७०)	२४	सूंसि नामा	सूंसिना मा	सुसी ना मा	सुसीना मा
(७१)	६१	मूलु	मळु	कर्मनिष्ठ मूळु	मळ
(७२)	६३	सात्वीक	वीण	—	—
(७३)	९२	वर्म	कर्म	—	—
(७४)	१८४	सेवटु	ऐल सेवटु	—	—
(७५)	२२५	करितां जाइजें	करितां न जाइजें	करितां जाइजे	न जाइजे
(७६)	२३३	तूटले	सूटले	सुखे लाभे जिती	सुटले जिती
(७७)	२३९	आर्गि	आंर्गि	—	—
(७८)	४१२	तेयाचें पण	तें अलिप्तपणें	—	लिप्तपणें
(७९)	४४१	चंद्रिका	चंडिका	—	—
(८०)	४५५	आर्गी	आंर्गी	—	—
(८१)	६९८	भयजन्म	जन्मभय	—	—
(८२)	७११	कें देखे। वंधातें जो	कां देखे। बंधातें जे	—	जो
(८३)	९४८	सुघासत्वाचिया	शुद्धसत्वाचिया	—	—
(८४)	९६७	समूल ज्ञान संन्यासें	समूलाज्ञान संन्यासें	मूळाज्ञान संन्यासें	—

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
येणें वाग्यज्ञें तोषावें
महाराष्ट्र साहित्य परिषद

(८५)	९७४	प्रेम हें	परम हे	—	—
(८६)	१०००	कामचि करुनि	कर्मेचि धारुनि	कर्मे करुनि	—
(८७)	१००७	क्रिया	क्रिया	—	—
(८८)	१००८	नेवों नेति	नेवों नेवों	—	—
(८९)	१२७४	घाडी वेद्य	घाडील	—	—
(९०)	१२९१	नव्हे प्रकाशुनि	प्रकाशुनि	—	—
(९१)	१३१५	ज्ञानी	ज्ञान	—	—
(९२)	१३१६	जिया	जया	जये	—
(९३)	१४८६	अनाकृती	अनासक्ती	—	—
(९४)	१५३२	स्वज्ञानजनितें	स्वाज्ञानजनितें	—	—
(९५)	१५४४	सकु	सकुटुंब	—	—
(९६)	१५६४	चर्मचक्षु	नाही चर्मचक्षु	—	—
(९७)	१५८७	व्यग्रता	वागर्या	—	—
(९८)	१५९४	हें बोलतां कां राओ	राया हें बोलतां विस्मित	हें बोलतां विस्मित	राया हें बोलतां विस्मित होय
(९९)	१६९१	काइकरुं	नभीचथिरु	—	—
(१००)	१६९६	निमले	न मिळे	—	—
(१०१)	१७१६	नेर्णे	लेंणें	—	—
(१०२)	,,	मोर्ले	मोकळें	—	—
(१०३)	१७२४	पाकु	पाठु	—	—
(१०४)	१७३३	भोगाचा वासना	भोगावी वासना	—	—

याशिवाय रा. मोडक यांनी ज्ञानेश्वरी ९-२९२ मधील 'आकाशु' हा राजवाडे पाठ बरोबर नसून 'आकारु' हा बंकटी पाठ बरोबर असल्याचें दाखविलें आहे[११]. रा. नेने यांनी १४-६० मध्ये 'पार्था मिचडी' याऐवजीं 'पार्थासि चडि (चाडि)' पाहिजे आणि १४-२८६ मध्ये 'ज्ञाना बूझ द्विरेफू कीं' याऐवजीं 'ज्ञानांबुज द्विरेफु कीं' हा पाठ बरोबर असल्याचें सुचविलें आहे[१२]. राजवाडे प्रतींतील पानाचें छायाचित्र मुद्रित स्वरूपांत पाहिलें तर त्यांत तीन मुद्रण-दोष आहेत. याप्रमाणे पांचशे पानांत १५०० मुद्रणदोष निघतील हें रा. मोडक[१३] यांचें म्हणणें अतिशयोक्त म्हणून सोडून दिलें तरी मूळाची नक्कल करतांना झालेल्या चुका व नंतर मुद्रण-प्रत करतांना व मुद्रण होतांना झालेल्या चुका यांमुळे राजवाडे-ज्ञानेश्वरींत बरेच अपपाठ राहिले आहेत ही गोष्ट कबूल केली पाहिजे. वर जे अपपाठ दिले आहेत त्यांपैकी कांहींचा अर्थ राजवाडे प्रतीप्रमाणे कष्टाने लावितांही येईल व तसा प्रयत्न कै. रा. ब. आगाशे यांनी आपल्या ज्ञानेश्वरींत केलाहि आहे. कारण त्यांनी राजवाडे पाठच सर्वत्र वापरले आहेत, पण राजवाडे प्रत पूर्णपणें निर्दोष आहे असें गृहीत धरून, मारून मुटकून लावलेल्या अर्थांनी मनाचें समाधान होत नाही.

(११) गो. कृ. मोडक-राजवाडे ज्ञानेश्वरीचें पुराणत्व भा. इ. सं. मं. त्रैमासिक वर्ष १५ अंक १.

(१२) द. ना. नेने-'राजवाडे ज्ञानेश्वरीचें पुराणत्व चर्चा' भा. इ. सं. मं. त्रैमासिक वर्ष १६ अंक १.

(१३) गो. कृ. मोडक-'राजवाडे ज्ञानेश्वरीचें पुराणत्व चर्चा' भा. इ. सं. मं. त्रैमासिक वर्ष १५ अंक १.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
महाराष्ट्र साहित्य परिषद

वर जे अपपाठ दिलेले आहेत त्यांना तसें मानण्याला जो अंतर्गत पुरावा आहे त्याचा आता थोडक्यांत विचार करूं.

(१) आता स्त्रीगणाचा पैकीं। माझिया विभूति सात एकि। तेती (तया) आईक कवतिकी। सांधिजती ॥ १०।२५४ असें स्वतः ज्ञानेशांनींच म्हणून सात विभूति सांगण्याला सुरवात केली व शेवटीं पुनः 'एवं नारी माझारि। इया सात शक्ती मी अवधारी' असेंहि म्हटलें आहे. तेव्हा त्यांनी साती विभूतींचें वर्णन केलें आहे व मधील दोन विभूतींचें वर्णन करणाऱ्या दोन ओव्या राजवाडे प्रतींत गळल्या आहेत हें आपोआपच सिद्ध होतें. रा. ब. आगाशे यांनीहि हें कबूल केलें आहे.

(२) मी कार्य उद्देशां। सकला माझि। हें वाक्य अपूर्ण राहतें. मूळांतील 'जयोऽस्मि' याचें विजय हें भाषांतर चरणारंभीं घातलें म्हणजे अर्थ पूर्ण होतो.

(३) विभूतिमत्सत्त्वाचें वर्णन असल्यामुळे 'मज येकाची सकल जनीं आज्ञा पालिजे' असें स्वतःचें वर्णन करण्यांत स्वारस्य नाही. पण हा पाठ कुंटे व आठल्ये यांनीहि घेतला आहे. साखरे–माडगांवकरांनी घेतला नाही.

(४) 'भरलें' हा पाठच बरोबर दिसतो. कारण परमेश्वराने सर्व व्याप्त आहे असें सांगावयाचें आहे. परमेश्वरापासून निर्माण झालें असें सांगण्याचा रोख नाही.

(५) अजामिळाने मुलाच्या नांवाचा ध्यास घेतला होता ही गोष्ट लक्षांत घेतली म्हणजे 'पाहतां' पेक्षा 'आळवितां' हा पाठच बरोबर दिसतो.

(६) 'गणिका' शब्द तिसऱ्या चरणांत आला आहे. तेव्हा 'नाइकें' (नायकीण) शब्दाने पुनरावृत्ति होते. शिवाय 'तूतें आराधितां' हा उलट अर्थ निष्पन्न होतो; म्हणून तुझी आराधना किंवा श्रवण–भक्तीहि न करणारी गणिका, पोपटाच्या निमित्ताने ईश्वरनामस्मरण घडल्यामुळे उद्धरून गेली हा अर्थ निष्पन्न होणारा पाठच बरोबर आहे.

(७) 'नानावर्णाकृतीनिच' याचें भाषांतर 'हे जैसे कां नानावर्ण। तैसे आकृतीं अनारिसेपण।' हेंच बरोबर आहे.

(८) 'दातांच्या फटींत' असा अर्थ असेल तर 'सवडीं' पाठच बरोबर आहे. 'व्याडिं' शब्दाचा तसा अर्थ नाही.

(९) 'जन्मलेल्यांना तुझ्यावांचून अन्य गति नाही' असें सांगावयाचें असल्यामुळे अन्य–'आन' हा पाठ युक्त आहे.

(१०) 'वीराचेनि बापें' हा पाठ येथे लागत नाही. उत्तराची कथा असल्यामुळे विराटाचेनि' हा पाठ ठीक दिसतो. 'बापु' शब्दाचा 'बापुडा' अर्थ केला म्हणजे तो पाठ ठीक होईल.

(११) धृतराष्ट्राला उद्देशून 'पूर्ण मनोरथ' हें विशेषण लावणें युक्त नाही तो 'अपूर्ण मनोरथ' राहिल्यामुळे, हाच पाठ बरोबर आहे.

(१२) 'इन्द्रनीलालाहि आपल्या तेजाचें सामर्थ्य दाखवीत' असा अर्थ असल्यामुळे 'इंद्रनीला' हा विभक्तिप्रत्ययान्त पाठच बरोबर आहे.

(१३) 'न तपोभिरुग्रैः' उग्रतपानेहि मी असा दिसणें शक्य नाही असें सांगावयाचें असल्यामुळे तो भावार्थ 'तपीं ऐश्वर्य देखिलें। आणि उग्रपणे उगेयाचि सांडिलें' या पाठांत चांगला येतो.

(१४) 'अपटांतरि' पेक्षा 'अपारांतरें' हा पाठच स्पष्टार्थक आहे व येथे मुद्रणदोषहि संभवतो.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
महाराष्ट्र साहित्य परिषद

(१५) 'वीर विलासे' असें अर्थात कर्से तरी बसवावें लागणारें वाक्य घेण्यापेक्षा 'वीर-विलासें' असें विशेषण घेणें चांगलें. हाहि मुद्रणदोष असावा.

(१६) 'आता भरंवसा जाला। जिणेयाचा' आता जीवनाचा भरंवसा वाटूं लागला असें म्हणावयाचें असल्यामुळे 'जिणेयाचा' हा पाठ बरोबर आहे.

(१७) पर्जन्याला पृथ्वीवांचून गत्यंतर नाही हा अर्थ शेवटचें साध्य दाखवितो व संदर्भाला जुळतो म्हणून 'धरावांचूनि' (पृथ्वीवांचून) हा पाठ बरोबर आहे. याचा 'धारावृष्टि' असा कुंट्यांनी दिलेला अर्थ बरोबर नाही. साखरे व आठल्ये यांनी बरोबर अर्थ दिले आहेत.

(१८) राजवाडे पाठाप्रमाणे 'त्याचें शरीर जें आहे तें मी होऊन राहतों' असा अर्थ होतो. 'सः माम् एति' या मूळाशीं तो अर्थ विरुद्ध आहे त्यामुळे त्याचें शरीर पडलें म्हणजे तो मीच होऊन राहतों असा अर्थ ज्याचा होतो तो 'जैं जाये। तैं' हाच पाठ बरोबर आहे.

(१९) 'सर्व कर्में तुलाच अर्पण करणारे' असा अर्थ आहे. 'सवर्म' याचा अर्थ बरोबर जमत नाही. हा मुद्रणदोषहि असावा.

(२०) आशा आणि निद्रा यांच्या जोडीला 'अधैर्य' वसूं शकतें व संदर्भाला हाच अर्थ जुळतो आरंभींचा 'अ' गाळण्याची जुन्या मराठींत क्वचित् प्रवृत्ति दिसते तसा प्रकार होऊन 'धैर्याचे' हा पाठ झाला असावा.

(२१) 'विचरे' या पाठानें ओवींत क्रियापद येऊन अर्थ पूर्ण होतो.

(२२) श्रीकृष्णाच्या वर्णनपर अशा या दोन ओव्या, श्रीकृष्णाचें अर्जुनाशीं भाषण संपल्यानंतर संजयाने म्हटल्या आहेत. त्या २३९ किंवा ४० नंतर आल्या पाहिजेत. साखरे, माडगांवकर, आठल्ये व कुंटे यांनी त्या तशाच दिल्या आहेत. रा. आगाशे यांच्या लक्षांत राजवाडे प्रतींतील हा दोष आलेला नाही.

(२३) 'आंधारे' असा पाठ संदर्भाला जुळेल 'विश्व आभासतसे जेणें। लपालेनि ॥२७७॥ हाच अर्थ 'चंद्रसूर्यादि थोरें...जयाचेनि आंधारे। प्रकाशति ॥' या ओवींत सांगावयाचा आहे. परमात्मा जोपर्यंत प्रकाशमान झाला नाही तोपर्यंत चन्द्रसूर्यांची प्रतिष्ठा! त्याच्यापुढे चन्द्र-सूर्याग्नि प्रकाशत नाहीत-असा अर्थ आहे.

(२४) हा मुद्रणदोष दिसतो.

(२५) मृगजलाच्या रूपकाला 'उखरीं' हा पाठच पाहिजे.

(२६) 'लाधलों' हा पाठ व्याकरणदृष्ट्या बरोबर आहे. वाक्यरचनेला तोच जुळतो.

(२७) हा मुद्रणदोष दिसतो. यमकाच्या दृष्टीने 'नीकी' हाच पाठ पाहिजे.

(२८) ज्ञानाला प्रतिबंधक काय आहे तें जाणावें असा अर्थ आहे म्हणून 'ज्ञाना काइ वोखटें आहे' हा पाठ बरोबर आहे.

(२९) 'ज्ञानयोगव्यवस्थितिः' याचा अर्थ 'योग ज्ञानीच' या पाठानें येतो. 'संयमाग्नी' या पाठाने फक्त योगच निर्दिष्ट होतो. राजवाडे पाठहि लावितां येईल. पण तो समाधानकारक वाटत नाही.

(३०) 'मनापासून धनापर्यंत सर्व श्रोत्यांच्या उपयोगीं लावावें असा अर्थ आहे म्हणून 'मानोंनि'पेक्षा 'मनौनि' हा पाठ चांगला आहे 'मानौनि' पाठहि लावितां येईल.

(३१) श्लोकांतील 'दान' शब्दाचा अर्थ 'दाने सर्वस्व देणें' या पाठानेंच व्यक्त होतो.

(३२ अ) 'सर्व धर्मांचिया' याचा नीट अर्थ होत नाही 'स्वधर्मांचिया किंवा 'स्वरूपाचेया' असा पाठ बरोबर होईल. सर्व धर्मांचा प्रसार करावयास सांगण्याचा हेतु नाही.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
महाराष्ट्र साहित्य परिषद

(३२ आ) मूळचा पाठ लावतां येईल पण मुद्रणदोष दिसतो. दुसरा पाठ अधिक चांगला आहे. शरिरांतून प्राणांची आटणी करणें या अर्थापेक्षा प्राणइंद्रियें—शरीर झिजविणें हा अर्थ अधिक सुसंगत आहे.

(३३) 'भूतीं' हा पाठ अधिक समर्पक आहे. 'इहींचां चैतन्य' या पाठांत एक सप्तम्यन्त पद कमी पडतें. पहिल्या चरणांत 'बालाचा' पुढें 'चित्ति' असें पद आहे.

(३४) हा मुद्रणदोष दिसतो. सत्य बोलण्याचें स्पष्टीकरण चाललें आहे. मागील श्लोकाचा संदर्भ पाहिला तर 'अविकार' हा पाठ बरोबर दिसतो. विकाररहितत्व हा सत्याचा एक गुण आहे. विचाररहितत्व हा दोष होईल. व इतर मार्गानें पाठ लावण्याचा प्रयत्न केला तर तो संदर्भाला जुळणार नाही.

(३५) 'शिरीं हालेयां'=सर्पाच्या कातीच्या शिरावर लाथ मारली तरी ती फडा उभारीत नाही ह्या अर्थाला हा पाठ बरोबर जुळतो.

(३६) ही ओवी १९३ च्या पुढे पाहिजे. कारण तींत धृतीचें लक्षण सांगितलें आहे. १९४ ओवीपासून 'शौच' या गुणाचें वर्णन सुरू आहे. तत्पूर्वी १८९ व्या ओवीपासून धृतीचें लक्षण सांगितलें आहे त्यांतील ही शेवटची ओवी आहे.

(३७) मुक्ताफलांच्या रूपकाला शुक्ति हा पाठच पाहिजे.

(३८) (३९) दैवी संपत्तीच्या गुणांचें वर्णन आतापर्यंत केल्यामुळे 'गुणराशी। संपत्तिरूप' हाच पाठ पाहिजे.

(४०) वाढपणाचा 'गारा' हा पाठ नीट लागत नाही. हा मुद्रणदोष दिसतो. 'डांगोरा' पाहिजे.

(४१) "विश्वाचें आयुष्य उजळे" हा पाठ घेतल्याने क्रियापद मिळून वाक्य होतें.

(४२) हा मुद्रणदोष असावा. मूळपाठापेक्षा 'रात्रिचा दिने धाकू धरिजे' हा पाठ अधिक स्पष्ट व काव्यपूर्ण आहे.

(४३) आसुरी संपत्तीच्या लोकांच्या पापपुण्यविषयक कल्पनांचें वर्णन चाललें आहे. पुढील ओवींत 'पाप' म्हणजे काय तें सांगितलें आहे. त्या संदर्भानें या ओवींत 'शून्य' च्या ऐवजीं 'पुण्य' पाठ बरोबर वाटतो.

(४४) दुसऱ्या व तिसऱ्या चरणाची अदलाबदल केली नाही तर वाक्यभेद होतो व अर्थ लागत नाही.

(४५) ही ओवी पुढील १७ व्या श्लोकावर आहे. 'ते दंभेन यजंते' याचा भावार्थ 'यजिती' हा पाठ घेतल्याने चांगला लक्षांत येतो.

(४६) हा मूळ पाठहि लावितां येईल. माडगांवकरांनी हाच पाठ स्वीकारला आहे. पण मग 'सवते' याचा अर्थ 'सोबती' असा करावा लागेल. त्यापेक्षा 'कृत्याकृत्य विचारा' पासून वेगळें केलें हा अर्थ अधिक चांगला लागतो.

(४७) कुंडे मंडप यांच्या संदर्भानें 'वेदी' हाच पाठ बरोबर दिसतो.

(४८) 'भलेया' म्हणजे भल्या लोकांना काम क्रोध वाटाडे दिले आहेत हा अर्थ बरोबर नाही. 'वाटेल त्याला' अशा अर्थी 'भलतेयां' किंवा 'भलेतया' हा पाठ बरोबर आहे.

(४९) तूं धर्माचा धाकटा भाऊ आहेस ही ओघानेच आपोआप घडून आलेली गोष्ट आहे अशा अर्थी 'हें ओबेंचि आलें आयतें' हाच पाठ योग्य आहे.

(५०) 'योग्यु होसी' याकडे संबंध लावण्याला 'लोकसंग्रहासी' असाच पाठ पाहिजे.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
महाराष्ट्र साहित्य परिषद

(५१) हा उघड मुद्रणदोष दिसतो· 'प्राणियाचा पडे'। विभागीं जे ॥ हाच पाठ बरोबर आहे.

(५२) 'खंडित तवें' या पाठापेक्षा 'पाखंडांचीं तवें' हा पाठ अधिक अर्थपूर्ण व संदर्भानुसारी आहे.

(५३) ज्ञानेश्वर मूळांतील सर्वच शब्दांचें स्पष्टीकरण करीत नाहीत असें सांगून मूळ· पाठाचें समर्थन करितां येईल. 'तपस्तथा दान' हा अर्थ 'तपदान' या पाठांत येतो.

(५४) साष्टांग नमस्कार करितो या अर्थी 'अंगेष्टी' (अंगयष्टी) हाच पाठ बरोबर आहे.

(५५) हा मुद्रणदोष दिसतो. 'आकाश' किंवा अवकाश हाच पाठ "पोकळीविण आकाश। होय जैसें॥" या संदर्भाच्या दृष्टीने येथे पाहिजे.

(५६) आत्मप्राप्ति झाल्यामुळे अशा अर्थी 'लाभले पणें' हा पाठ शुद्ध आहे· मूळ पाठहि लावतां येईल. पण त्यांत 'लोभीपणाचा' जरा गौण अर्थ येतो.

(५७) २६० आणि ६१ ओव्यांची अदलावदल केली पाहिजे कारण २५९ व्या ओवींत दृष्टान्त आहे व २६१ व्या ओवींत दार्ष्टान्तिक आहे. तेव्हा त्या ओव्या आधी घेऊन मग तामस तपाच्या वर्णनाचा उपसंहार करणारी २६० वी ओवी आली पाहिजे.

(५८) सत्पात्रीं दानाचें वर्णन प्रस्तुत असल्यामुळे 'वित्ता'चें निवर्तन हाच पाठ पाहिजे.

(५९) गाजावाजा न करितां व प्रत्युपकाराची अपेक्षा न करितां दान करावें असा अर्थ प्रस्तुत असल्यामुळे 'सादु घातलेल्या आकाशा। नेंदी प्रतिशब्दु जैसा' हा पाठ बरोबर आहे.

(६०) ३०६–७ ओव्यांत अदलावदल पाहिजे. ३०५ व्या ओवींत तामस दानाचें वर्णन झाल्यावर, ३०७ व्या ओवींत तीन्ही प्रकारचीं दानें सांगितलीं असा उपसंहार केला आहे म्हणून ती ३०६ वी पाहिजे. ३०६ वींत वेगळें विधेय सुरू होत असल्यामुळे ती ३०७ वी पाहिजे.

(६१) संदर्भ व मागचे दृष्टान्त पाहिले तर, सात्त्विक कर्मांतहि मोक्षाला प्रतिबंधक न होणारें कर्म वेगळेंच आहे, अशा अर्थाचा 'तें वेगळें गा' हा पाठ बरोबर दिसतो.

(६२) यज्ञ ही त्यांच्या उपजीविकेची वृत्ति केली या अर्थी 'जीविके' हाच पाठ पाहिजे.

(६३) 'उपनिषदातें' हा राजवाडे पाठच माडगांवकर, कुंटे व आठल्ये यांनी घेतला आहे. पण 'तुरंगी' हें आज्ञार्थी क्रियापद मानिलें तर 'उपनिषदाचें' हा साखरे पाठ बरा दिसतो.

(६४) मूळ 'घेओ' पाठहि लावितां येईल. 'लेवों' पाठ अधिक स्पष्ट आहे.

(६५) हा मुद्रणदोष दिसतो. 'बाण' हा पाठ लागत नाही, 'बापा' पाहिजे.

(६६) 'नेणती' असा पाठ घेतला तर त्याचा संबंध 'महंताच्या कोटी'कडे जाईल व अर्थ नीट लावणार नाही म्हणून 'त्यांचा मान कसा करावा हें समजलें नाही तर' या अर्थी 'नेणतां' असाच पाठ पाहिजे.

(६७) हा मुद्रणदोष असावा. यज्ञविधि अशा अर्थी 'विधानीं' असा पाठ पाहिजे.

(६८) मूळपाठ हा 'व्यंगलिया' या पाठाचें अपभ्रष्ट रूप दिसतें. व्यंगयुक्त कर्माला सत् शब्द लाविला म्हणजे तें पूर्ण होतें या अर्थी 'व्यंगलिया' पाठ अधिक स्पष्ट आहे.

(६९) 'आक्षेपावें' याचाच 'अपेक्षावें' असा अर्थ केला तरच मूळपाठाचें समर्थन होईल.

(७०) मुद्रणदोष दिसतो. मौनावांचून दुसरें लेणें घालीत नाहीस या अर्थी 'सूसिना' पाठ ठीक आहे.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
महाराष्ट्र साहित्य परिषद

(७१) राजवाडे-माडगांवकर पाठ एक आहेत. पण 'मूळु' पाठ लागत नाही. कर्मनिष्ठालाही दोष ठेवल्यासारखें होतें या अर्थी 'मलु' पाठ ठीक आहे.

(७२) रज व तम दोन्ही गुण गेल्यावांचून श्रद्धेला ब्रह्म नांवाची सर कशी येईल या अर्थी 'गेलेया वीण' पाठ बरा लागतो.

(७३) कोणत्या कर्माचें फल टाकावें व कोणतें कर्मच स्वरूपतः टाकावें असा अर्थ आहे. त्या दृष्टीने 'सांडिजे कोण 'कर्म' केवल' हा पाठ बरोबर आहे.

(७४) वरचे दृष्टान्त पाहिले तर त्यांना 'ऐल सेवटु' हाच पाठ बरोबर जुळतो.

(७५) माडगांवकरांचा व राजवाडे पाठ एक आहेत. पण पुनः शरीर नको असेल तर त्याला एकच उपाय आहे. तो म्हणजे फलाशेच्या आहारीं न जाणें हा होय. या अर्थी 'न जाइजे हारी' हाच पाठ बरोबर दिसतो.

(७६) मुद्रणदोष असावा. विषाचें आगर विकलें की ते सुटतात या अर्थी 'सूटले' पाठ पाहिजे.

(७७) मूळ पाठ घेतला तर त्याचा 'आगींत' असाहि अर्थ होऊन विरुद्ध अर्थ निर्माण होईल.

(७८) 'तेयाचें पण' या मूळ पाठाचा अर्थ होत नाही म्हणून 'अलिप्तपण' हा पाठ पाहिजे.

(७९) मुद्रणदोष आहे. सोन्याचीच चंडिका, सोन्याचाच भाला व सोन्याचाच महिषासूर असा दृष्टान्त ब्रह्मैक्याला द्यावयाचा आहे. म्हणून 'चंडिका' हा पाठ पाहिजे.

(८०) येथेहि 'आंगी' असा पाठ पाहिजे, कर्म प्रवृत्तीकरिता त्याच्या शरिराला आयास पडत नाहीत असा अर्थ आहे. 'आगीं' या मूळ पाठाचाच 'आंगीं' असा अर्थ केला तरच अनर्थ होणार नाही, आगीं हा अग्नीचाच अपभ्रंश आहे. अंगाचा नाही.

(८१) नित्यकर्म, आत्मप्राप्तिफल दृष्टीपुढे ठेवून केले असतां जन्ममरणपरंपरा चुकून मोक्ष मिळतो असा अर्थ आहे म्हणून 'जन्मभय' असा पाठ पाहिजे 'भयजन्म' या पाठांत शब्दांची उलटापालट झाली आहे. 'भवजन्म' असा पाठ तरी निदान असला पाहिजे. तर अर्थाला कांहीतरी जुळेल.

(८२) सात्त्विक बुद्धीचें वर्णन चाललें आहे व निषिद्ध कर्मामुळे बंध प्राप्त होतो हें जिला समजतें असें तिचें एक लक्षण दिलें आहे. म्हणून 'निषेधिं कां देखे । बंधातें जे' असा पाठ पाहिजे. साखरे-माडगांवकरांनी हा पाठ घेतला आहे.

(८३) वरील ओवींत 'तमरजां झाडि करुनि' असें म्हटलें आहे. त्या संदर्भाला धरून येथे शुद्धसत्त्वाचिया असा पाठ पाहिजे.

(८४) वरील ओवींत अबोध नाशासवें । नासे क्रियाजात आघवें, असें म्हटलें आहे. त्या संदर्भाला धरून समूलाज्ञानसंन्यासें असा पाठ पाहिजे. 'दृश्याचा ठाओ जेथ पुसे' ह्यापुढील चरणाच्या संदर्भालाहि हाच पाठ जुळतो.

(८५) नैष्कर्म्य सिद्धिं परमां...अधिगच्छति या श्लोकार्धाला अनुसरून "तैसें न होणें निफजे । नैष्कर्म्य सिद्धि म्हणिजे । सर्वांही सिद्धी साहाजें । परम हें चि" असा पाठ पाहिजे. 'प्रेम हें चि' हा पाठ बरोबर नाही.

(८६) पुढील संदर्भ व 'तो जेणें क्रमें ब्रह्म । होणें करी कां सुगम' ही १००४ ओवी पाहिली म्हणजे 'क्रमेंचि करुनि' हाच पाठ बरोबर वाटतो. 'कामाचि वारुनि' हा पाठ चूक आहे.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
महाराष्ट्र साहित्य परिषद

(८७) हा मुद्रणदोष दिसतो. 'सांडोनि कुळें दोन्ही । प्रिया अनुसरे कामिनी' असा पाठ पाहिजे.

(८८) नेऊन नेऊन अशा अर्थी 'नेवों नेवो' हा पाठ सर्व दृष्टींनी चांगला लागतो.

(८९) तुझा नैसर्गिक स्वभाव, तुझा न लढण्याचा निर्धार नाहीसा करील. अशा अर्थी 'वाया धाडी वेलु' या ऐवजी 'वायां धाडील' हा पाठ बरोबर आहे.

(९०) सर्वांच्या हृदयांत असणारा अीश्वर तिन्ही अवस्थारूपी तीन लोक, प्रकाशित करतो असा अर्थ आहे. येथे 'नव्हे प्रकाशूनि' असा पाठ कसा शिरला तें समजत नाही. पुढील संदर्भावरूनहि हा पाठ बरोबर नाही असें वाटतें. चिद्वृत्तीच्या सहस्र करांनी उदय पावलेला, अीश्वर असें ज्याचें वर्णन मागील ओवींत केलें आहे तो 'नव्हे प्रकाशूनि अशेष' म्हणजे काय तें स्पष्ट होत नाही. तेव्हां 'नव्हे' शब्द गाळला पाहिजे.

(९१) 'अिति ते ज्ञानमाख्यातम्' याचा भावार्थ 'ज्ञान ऐसिया रूढी । वेदांति जयाची प्रसिद्धि' या पाठानेच चांगला व्यक्त होतो.

(९२) 'हें गीता नांव विख्यात' हा मागील व 'तें हें गा आत्मज्ञान' हा पुढील संदर्भ लक्षांत घेतला तर 'मी सर्व द्रिष्टीहि दिसे । पाहों जया' हाच पाठ बरोबर वाटतो.

(९३) 'अशुश्रूषु' असेल त्याला गीता सांगूं नये असा अर्थ आहे. शास्त्रश्रवणीं अनासक्ति हा पाठ 'अनाकृती'पेक्षा चांगला व बरोबर आहे. 'अनार्ति' पाठहि चालेल.

(९४) स्वाज्ञान जनितें । मागिलें मोहें तूतें । हाच पाठ बरोबर आहे. कारण मोह हा स्वरूपाच्या अज्ञानामुळेच उत्पन्न होतो.

(९५) 'सकुटुंब' या पाठाने अर्थ पूर्ण होतो. 'सकु' पुढील अक्षरें मुद्रणांत गळालीं असावीं. 'सकु' शब्दाचा 'सत्ता' हा पुढे दिलेला अर्थ येथे जुळत नाही.

(९६) धृतराष्ट्राला 'नाही चर्मचक्षु' हाच पाठ बरोबर आहे.

(९७) श्वासोच्छ्वासामुळे बोलणें बंद झालें हा अर्थ 'वागर्था पडे मिठी' या पाठानेच व्यक्त होतो.

(९८) 'हें बोलतां विस्मित होए' हा माडगांवकरांचा पाठ चांगला दिसतो. मूळ पाठहि लावितां येईल पण राओच्या ऐवजीं 'राया' असा द्वितीयान्त पाठ घेतला पाहिजे.

(९९) संदर्भ व इतर दृष्टान्त पाहिले तर 'नभीच थिरु' हा पाठ शुद्ध दिसतो.

(१००) 'न मिळें' पाठ 'युगति न मिळे' या वाक्याला जुळतो. 'न मिळे' याचेंच 'निमले' झालें असावें.

(१०१) } हे दोन्ही मुद्रणदोष असावे. 'लेणें' व मोकळें'.

(१०२) } हे दोन्ही पाठ अर्थाला चांगले जुळतात.

(१०३) 'गीता पाठ करण्याच्या मिषाने' या अर्थी 'पाठु' हा पाठ शुद्ध दिसतो.

(१०४) अव्यत्यय समाधि भोगावी अशी वासना झाल्यामुळे, हें ज्ञान मत्स्येन्द्राने गोरखनाथाला दिलें असा अर्थ आहे म्हणून 'भोगावी वासना' हा पाठ शुद्ध आहे.

संदर्भाच्या, व्याकरणाच्या आणि अर्थाच्या दृष्टीने अशुद्ध असलेले कांही पाठ वर दाखविले व त्यांचीं थोडक्यांत कारणेंहि सांगितलीं. राजवाड्यांच्या वरीलपैकी कांही किंवा सर्व पाठांचें समर्थनहि कोणी करतील पण त्याकरिता राजवाडे प्रत सर्व दृष्टींनी निर्दोष आहे ही असिद्ध गोष्ट गृहीत धरावी लागेल. सर्व दृष्टींनी शुद्ध अशी ज्ञानेश्वरीची प्रत अद्यापि व्हावयाची आहे. रा. माडगांवकर यांच्याजवळ एकनाथपूर्वकालीन एक प्रत होती असें म्हणतात. तसेंच

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
महाराष्ट्र साहित्य परिषद

रा. कानोले यांसहि एक प्रत सांपडली आहे. अशा प्रती जमा करून, कोणत्याहि मताचा आग्रह न धरितां शुद्ध प्रत तयार केली पाहिजे. आजच्या स्थितींत भाषेच्या दृष्टीने राजवाडे-प्रतच सर्वांत प्राचीन आहे. म्हणून अभ्यासाकरिता तीच घेणें युक्त असलें तरी या प्रतींत कांही अपपाठ राहिल्यामुळे इतर प्रतींचेंहि साहाय्य घ्यावें लागतें. ज्ञानेश्वरीच्या तत्त्वज्ञानांत भेद उत्पन्न करणारे अपपाठ मात्र राजवाडे–प्रतींत कोठेंहि आढळले नाहीत हें येथे सांगितलें पाहिजे. तसेंच इतर प्रतींच्या तुलनेने अनेक चांगले पाठहि राजवाडे प्रतींत आहेत. नमुन्यादाखल कांही पाठ दाखवून हा लेख संपवूं.

	अध्याय व ओवी	राजवाडे	साखरे	माडगांवकर
(१)	अ. ११–११०	पाही	देह	...
(२)	४०५	असकीं गवसी	सासिकवचेंसी	...
(३)	४८५	जुहारी	जोहारूनि	जूहारूनि
(४)	६४२	जालालागु	नव्हेची लागु	...
(५)	अ. १२–२१९	तेयाचे टांक	टांच धरूं	...
	,,	धरूं कंठीं आम्ही	हृदयी	...
(६)	अ. १३– १४	साजीव	सावेव	...
(७)	अ. १४– ८६	घरणी	गृहिणी	...
(८)	८६	अर्वाच्य	अनिर्वाच्य	...
(९)	अ. १६– १८	वेदांचें मान पाऊनियां	देवांचें मान	...
(१०)	२११	काललोहाचो भाली	दोषकाट्यांची जरी भरली	...
(११)	२३३	वेदांतें	बापातें	
(१२)	२३४	मानितेचा गंडु	पुष्टगंडु	
(१३)	३३५	एकु कवलु न्हुर्ती मासा। तोडुनि नेयिजे जैसा	आमिष कवळु थोरी आशा । न विचारिता गिळी मासा।	
(१४)	अ. १७– ६४	कर्मांची सुणी	कर्मांची केरसुणी	
(१५)	अ. १८–२०१	सलगी	सगळी	
(१६)	६००	पाटाचें आंक जैसें	वाणें सारी	

* कुंटे व आठल्ये पाठ साखरे प्रतीप्रमाणेच आहेत.

(१) विश्वरूप दाखविण्याविषयी विनंती करितांना अर्जुन श्रीकृष्णाला म्हणतो की, तूं उदार झालास म्हणजे पात्रापात्र विचार करीत नाहीस (११–९८) पूतना, शिशुपाळ, अजामिळ, वेश्या इत्यादिकांना सुद्धा कांही तरी निमित्त काढून तूं मोक्ष दिलास. जी कामधेनु सर्व जगाच्या इच्छा पूर्ण करते तिचे वत्स कधी भुकेले राहतील काय ! म्हणून मीं विनंती केली असतां देव मला विश्वरूप दाखविणार नाहीत असें मुळीच नाही. परंतु विश्वरूप पाहण्याची मला पात्रता आहे. हेंहि देवा तूं पाहा. असा संदर्भाप्रमाणें अर्थ आहे. इतर अपात्र व्यक्तींच्या दृष्टीने मी पात्र असल्यामुळे, विश्वरूप दाखविण्यास कांहीच अडचण नाही असें अर्जुनास म्हणावयाचें आहे. म्हणून 'पाही' हा पाठच संदर्भाला जुळतो.

(२) तेथ म्हणे हा एके वेळे। असकीं गवसी दोन्ही दळें। यांतील असकीं शब्दाचा अर्थ न लागल्यामुळे बहुधा 'सासिक वचेंसी' हा पाठ रूढ झाला असावा. 'अग्रेण सहितं—साग्र

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
महाराष्ट्र साहित्य परिषद

आ+साम्र-असक-अजक असा हा शब्द व्युत्पादितात. सगळा या अर्थी अजका हा शब्द कोंकणांत अद्यापि प्रचलित आहे. एकाच वेळीं दोन्ही सैन्यें सगळीं ग्रासतों अशा अर्थी 'असकी गवसी' हा पाठच शुद्ध आहे.

(३) हा पाठ सर्वांनी थोड्या फरकाने घेतला आहे. जुहारणें, जोहारणें, हें क्रियापद ज्ञानेश्वरकाळीं रूढ होतें असें यावरून दिसतें. 'जय हर' शब्दापासून 'जोहार' शब्द व्युत्पादितात. एकनाथांनी केलेल्या महारावरील रूपकांतहि तो आला आहे. शंकराची उपासना मागे पडली तेव्हा 'जयराम' किंवा 'रामराम' शब्द नमस्कारार्थी महाराष्ट्रांत रूढ झाला असावा. शैव आणि वैष्णव पंथांचे उत्कर्षापकर्ष हे शब्द सुचवितात.

(४) हें रूपक अत्यंत सुंदर आहे. कृष्णाकृतीच्या रूपाने विश्वरूपी वस्त्राची घडी केली होती. ती अर्जुनाच्या प्रेमाने, देवाने उघडून दाखविली, तें वस्त्र गिऱ्हाइकाला पसंत पडलें म्हणून त्याची पुनः घडी केली असा अर्थ आहे व त्या दृष्टीने 'ग्राहकैये जाला लागू' हा राजवाडे पाठ बरोबर आहे. 'ग्राहकैये नव्हेचि लागु' असा नवा पाठ गौण अर्थ निष्पन्न करितो. अर्जुनाला तें वस्त्र पाहिजेच होतें. फक्त तें उलगडलें होतें त्याची घडी करा असें अर्जुन सांगत होता. या दृष्टीने राजवाडे पाठ अधिक काव्यपूर्ण व यथार्थ आहे.

(५) अशा भक्ताची प्रतिमा धारण करूं अशा अर्थी राजवाडे पाठ शुद्ध आहे. 'टांच धरूं । हृदयीं आम्हीं' हा पाठभेद संदर्भाला जुळत नाही. कारण येथे 'भक्तप्रियत्व' गुण विवक्षित आहे क्षमाशीलत्व नाही. म्हणून राजवाडे पाठ युक्ततर ठरतो हें रा. मोडक यांनी चांगलें दाखविलें आहे.[१४]

(६) 'साजीव' पाठाने क्षेत्राबरोबर क्षेत्रज्ञाचाही उल्लेख होत असल्यामुळे तोच शुद्ध दिसतो.

(७ व ८) घरणी व अर्वाच्य शब्द एकनाथपूर्वकालीन आहेत. संस्कृताच्या पुनरुजीवनामुळे त्यांच्या ठिकाणीं 'गृहिणी' व 'अनिर्वाच्य' हे पाठ आले.

(९) स्तुति करण्याचा संबंध असल्यामुळे स्तुतीला 'वेदांचें मान' मिळणेंच युक्त आहे देवांचें मान मिळण्यांत स्वारस्य नाही, वेदच परमेश्वराची स्तुति करितात, म्हणून मूळ पाठ शुद्ध आहे.

(१०) दोन चरणांत भिन्न उपमा आहेत. या दृष्टीने मूळचा पाठ शुद्ध आहे.

(११) 'ईश्वराचेंहि नांव न साहे' या संदर्भाने 'वेदातें' हाच पाठ युक्त आहे.

(१२) 'मानितेचा गंडु' हा पाठ शुद्ध आहे. अभिमान–अहंकार या आसुरी संपत्तीच्या गुणाचें वर्णन करितांना ही ओवी आली आहे. याच शब्दाच्या धोरणाने 'अहंगंड' 'न्यूनगंड' असे शब्द आता रूढ होत आहेत. 'पुष्टगंड' या नवीन पाठाची कांहीच आवश्यकता येथे नव्हती.

(१३) या ठिकाणीं मूळांतला सर्व दृष्टींनी सुंदर पाठ बदलण्याची कां आवश्यकता वाटली तें समजत नाही. "आशापाशशतैर्बद्धाः" याचें स्पष्टीकरण मूळपाठानेच चांगलें होतें. 'एक कवळु वहुतीं माशा । तोडुनु नेयिजे जैसा' त्याप्रमाणे विषय-आशांचे शेकडो पाश मनुष्याला गांजतात. पाण्यांत एक घांस टाकला तर शेकडो मासे त्याच्यावर तुटून पडतात तशी मनुष्याची स्थिति होते, हें सांगावयाचें आहे. त्या दृष्टीने मूळ पाठ चांगला आहे. पाठभेदांत 'बद्धाः' शब्दावर लक्ष देऊन, आमिषाने मासे बद्ध होतात अशी कल्पना मांडलेली दिसते.

(१४) मूळ पाठ अधिक चांगला आहे. जेव्हां सत्वगुण कमी होऊन रजोगुण वाढतो त्या वेळीं श्रद्धा ही कर्माची सुणी म्हणजे कुत्री होते असा अर्थ आहे. सुणीच्या ऐवजी 'केरसुणी' पाठ कमी प्रतीचा आहे.

(१४) गो. कृ. मोडक–'राजवाडे ज्ञानेश्वरीचें पुराणत्व' भा. इ. सं. मं. वर्ष १५ अंक १ ला.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
महाराष्ट्र साहित्य परिषद

(१५) 'सलगी' हा मूळ पाठ भाषाशास्त्रदृष्टया अधिक शुद्ध आहे. स–लग्न, सलग, सलगी–सगळी अशा परंपरेने हा व्युत्पादिला जातो. सगळी पेक्षा सलगी रूप जुनें आहे.

(१६) आणि तेयाही केलेयाचें । तोंडी लावी डौंडिचें ।
कर्मि या नांवें पाटाचें । आंक जैसें ॥ ६००

येथे 'पाटाचें । आंक जैसें' हा पाठ न लागल्यामुळे 'वाणें सारी' असा पाठभेद इतर प्रतींत केलेला आढळतो. काम्यकर्मे करणारा मनुष्य फलाच्या आशेने कर्मे करितो व आपण अमुक अमुक यज्ञ केले अशा अर्थाची सगळीकडे दवंडी पिटीत फिरतो. काम्यकर्मच आधी वाईट व त्याची प्रसिद्धि करीत सुटणें आणखी वाईट असा भाव आहे. कै. रा. ब. आगाशे यांनी राजवाडे पाठ कायम ठेवून त्याचा अर्थ लावण्याचा प्रयत्न केला आहे. पाट म्हणजे पाण्याचा पाट व आंक म्हणजे अंक–आंकडा असा अर्थ घेऊन 'अमुक नंबरचा पाट अमुक शेतकऱ्याचा' म्हणून जशी प्रसिद्धि असते त्याप्रमाणे अमुक कर्म अमक्याने केलें अशी प्रसिद्धि करण्यांत येते. असा या पाठाचा अर्थ सुचविला आहे. तो समाधानकारक नाही असें त्यांनीच म्हटलें आहे. या पाठाचा खालील अर्थ असावा असें वाटतें : पाट म्हणजे पट, वस्त्र व आंक म्हणजे आंख. अंक–आंक–आंख अशा परंपरेने हल्लीचा आंख शब्द आलेला दिसतो. अमुक वस्त्र अमुक आंखाचें अशी जशी प्रसिद्धि असते त्याप्रमाणे अमुक यज्ञ अमक्याने केला अशी प्रसिद्धि कर-तात असा या पाठाचा अर्थ दिसतो. वस्त्रावर घातलेल्या अंकामुळे त्या वस्त्राची लांबी, रुंदी व योग्यता समजावी अशी योजना आताप्रमाणेच पूर्वीहि असावी व अमुक आंखाचें वस्त्र अमुक तऱ्हेचें असतें अशी व्यापारी आणि गिऱ्हाईक यांच्यांत प्रसिद्धि असावी असें दिसतें. हा अर्थ जर बरोबर असेल तर राजवाडे–प्रतींतील मूळ पाठच योग्य आहे असें म्हणावें लागेल.

ज्ञानेश्वरांच्या तत्त्वज्ञानाच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरतील असे बदल पूर्वकालीन पाठांत नंतर अगदीच क्वचित् झाले आहेत; उ.–दहाव्या अध्यायाच्या 'न मे विदुः सुरगणाः' या दुसऱ्या श्लोकावर टीका करितांना ज्ञानेश्वर म्हणतातः—परि किरीटी मातें । तूं नेणसि ना निरुतें । तरि तोचि मी जेथें । विश्व हें स्वप्न ॥ ६२ ॥ या राजवाडे- पाठाऐवजी साखरे प्रतींत पुढील पाठ आढळतो—तरि तो गा जो मी एथें । तें विश्वचि हें ॥ साखरे पाठ व्याकरणदृष्टया तित-कासा शुद्ध नाही. दहाव्या अध्यायांत ईश्वराच्या विभूति सांगितल्या असल्यामुळे त्याला शोभेल असा 'मी हें विश्वच आहे' अशा अर्थाचा हा पाठ कोणीतरी मागून घातला असावा. याच्या उलट हें विश्व ज्याचें स्वप्न आहे, किंवा ज्याच्या आधाराने विश्वाचें हें स्वप्न दिसत आहे अशा अर्थाचा राजवाडे पाठ ज्ञानेशांच्या तत्त्वज्ञानाच्या दृष्टीने महत्त्वाचा व जुना म्हणून माह्य आहे. ज्ञानेश्वरींतील निर्गुण अद्वैतपर किंवा मायावादपर असे जुने पाठ बदलण्याचे व त्या जागी क्वचित् सगुणपर पाठ घालण्याचे प्रयत्न नंतर झाले असावेत असें यावरून अनुमान निघतें.

टीप—पान १६६ वर पाठक्रमांक (२३) नंतर अध्याय ६ ऐवजीं १६ पाहिजे. क्रमांक (५०) नंतर अध्याय १७ सुरू होतो. क्रमांक (५७) नंतर होत नाही हें ओव्यांच्या आंकड्यांवरून सहज लक्षांत येईल. पान १६८ वर पाठक्रमांक (८६) १००० कामचि वाशनि-क्रमेंचि करुनि, आणि (८७) १००७ क्रिया प्रिया असा वाचावा.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
महाराष्ट्र साहित्य परिषद

परीक्षणें

छन्दोरचना

(लेखक :—प्राध्यापक मा. त्र्यं. पटवर्धन; प्रकाशक:— कर्नाटक प्रकाशमन्दिर, मुंबअी २; मूल्य : ४ रुपये; पृष्ठसंख्या ६००).

श्री. माधवराव पटवर्धनांचा पद्यशास्त्रावरचा हा ग्रंथ हातांत घरतांच Milton's Prosody 'मिल्टनची पद्यरचना' हा अतिशय मूलगामी ग्रंथ लिहिणारे अिंग्लंडचे खिस्तवासी राजकवि रॉबर्ट ब्रिजिस् यांची आठवण होते. प्रा. जॉर्ज सेण्ट्सबरीसारख्या पद्यशास्त्राच्या सर्वश्रेष्ठ अितिहासकाराने विरोध असताहि मान तुकविण्यासारखा, अिंग्रजी पद्यरचनेचा स्वतंत्र दृष्टीने अभ्यास करून लिहिलेला तो ग्रंथ आणि साहित्यसम्राट न. चिं. केळकरांनी मुक्तकंठाने प्रशंसिलेला छन्दोरचनेवरील हा नूतन पद्धतीचा अनुपम ग्रंथ म्हणजे सरस्वतीच्या कंठांतील सुभग आभरणेंच आहेत. प्रथमश्रेणीच्या कवींनी निर्मिलेल्या त्या छन्द:कृति त्या शास्त्रावरील अधिकारी ग्रंथराजच होत.

आणखी, केवळ मराठीच नव्हे तर अखिल संस्कृत—प्राकृत—पद्यरचनेवरील विवेचनाचा 'छन्दोरचना' हा अेक ज्ञानकोशच आहे. अितका मूलग्राही नी विशाल ग्रंथ भारतांतील मराठीतर प्रांतीय भाषांत अजून झाला नाही, असा निर्वाळा गुजराती त्रैमासिक "मानसी" मध्ये जळगांवच्या संमेलनाध्यक्षांचा परिचय करून देतांना श्री. देसाअी यांनी दिलाच आहे. प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षरीत्या संबद्ध अशा अनेक गोष्टींची पांडित्यपूर्ण चर्चा या ग्रंथाच्या आरंभींच्या विवेचनांत आणि अन्तींच्या अितिहासांत आपणांस आढळते. तसेंच या ग्रंथाचें महत्त्व ज्या स्वतंत्र विचारसरणींत आहे ती लेखकाच्या शब्दांत सांगावयाची तर अशी आहे:

> "पद्यरचना ही वृत्तजातिछन्द:स्वरूप अशी त्रिविध आहे.... आणि पद्य म्हणजे लयबद्ध अक्षररचना (हा) स्वतंत्रपणें सुचलेला सिद्धान्त मीं सर्वत्र लाअून दाखविला आहे.... नांवांचा घोटाळा जवळजवळ नाहीसा केला असून वृत्तांचीं प्राचीन आणि दुर्मिळ अुदाहरणें दिलीं आहेत.... जातिविषयक आणि छन्दोविषयक चर्चा करणारीं प्रकरणें हीं सर्वस्वीं स्वसंशोधित आणि स्वरचित आहेत."

सुधारणा अशा रीतीने त्रिविध झाली आहे. व्याख्या, वर्गीकरण आणि अुदाहरणें. प्रथमावृत्तीतील चतुरक्षरी गणांच्या नवीन प्रसारखेळाने (permutation) कांहीशी त्र्यक्षरी गणांच्या सारखीच स्थिति अुत्पन्न झाली होती. चतुरक्षरी गण गाळून आणि त्यांचा समावेश विविध मात्रावर्तनांत करून या नवीन आवृत्तींत शास्त्रशुद्धता आणिली आहे. पद्म (८), अग्नि (७), भृङ्ग (६), हर (५) इत्यादि मात्रावर्तनांनी पद्यांचें त्रिविध वर्गीकरण केलेलें आहे. वृत्त—जाति—छन्द असे भाग पाडून, 'वृत्तांत' मात्राक्षरनियत पद्यप्रकार, 'जातींत' मात्रानियत पद्यरचना आणि 'छन्दांत' अक्षरनियत पद्यें अशी व्यवस्था करून, पद्यजगतांत व्यवस्थितता आणिली आहे; विशेष हें की, 'वृत्तां'मध्येहि नवीन आवर्तनी मोडणी वापरून त्यांतील लयबद्धत्व दाखवून आपली पद्याची व्याख्या सिद्ध करून दाखविली आहे.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
महाराष्ट्र साहित्य परिषद

पण हा "पटवर्धनी" पांडित्यसोहळा जरी कितीहि विस्मायक असला तरी खरी "माधव-ज्यूलियनी" ऐट आणि हृदयंगमता लेखकाच्या स्वकृत उदाहरणांत दिसून येते. शास्त्रीय ग्रंथांतील उदाहरणात्मक पद्यांत प्रायः मोहकता उणी असते, पण गोपीनाथ तळवलकरांप्रमाणेच प्रस्तुत समीक्षकालाहि या ग्रंथांतील श्री. माधवरावांचीं पद्यें फारच रम्य वाटतात. विशेषत: फारसी जातीच्या उदाहरणांत फारसी वाङ्मयांत निसर्गतः असलेली आणि श्री. माधव—ज्यूलियनांत सुद्धा उत्कटत्वाने दिसणारी रम्यात्मकता (romanticism) उत्तम प्रतीत होते. जुन्या आवृत्तींत अशीं अनेक पद्यें इतर उदाहरणांसाठीहि वापरलीं होतीं (उदा. साकी—दोहा या पद्यपकारांचीं उदाहरणें) पण दुर्दैवाने तीं या नवीन आवृत्तींत नाहीत. या फारसी वृत्तांचें प्रमाणहि योग्य असेंच या आवृत्तींत ठेविलें आहे. तीं वृत्तें मराठीला नवीन दालन उघडें करतात; आणि त्यांची पूर्वीची अतिक्रमणशीलताहि "भाषाशुद्धिवीर" प्राध्यापकांनी आता आटोक्यांत आणिली आहे. त्यामुळे सुंदर समन्वय साधला गेला आहे.

अशा रीतीने पद्यपंडितांच्या मालिकेंत ह्या ग्रंथकारांचें स्थान "सर्वश्रेष्ठ आधुनिक पद्यशास्त्रज्ञ" हेंच आहे. तरी पण कांही गोष्टींत लेखकांचीं वैयक्तिक मतें आणि बंधनें मतभेद निर्मितात. सर्वांत अधिक मतभेद जाति—छन्दांच्या नामकरणासाठी त्यांनी स्वत:वर जो नियम लादला आहे त्यासंबंधाने आहे. ज्या वृत्त-जाति—छन्दांना पूर्वी नांवें नव्हतीं त्यांना त्यांच्या सर्वांत जुन्या उदाहरणांतील कांही शब्दांवरून नांवें देण्यांत आलीं आहेत. पण नवीन आवृत्तींत या नियमाने विरस वातावरण निर्मिलें आहे. प्रथमावृत्तींत जितकें संशोधन झालें तेवढ्यावरून पद्यनामें एकदा निश्चित केल्यावर नवीन संस्कारणांत अधिक माहिती सापडल्यावरून तीं पार न बदलतां तीं अधिक परिचित नांवें जुन्यांत जुन्या उदाहरणांत नसलीं तरी तशींच ठेवण्यांत औचित्यभंग कोठे झाला असता तें समजत नाही. त्यामुळे "सूर्यकान्ता"सारख्या सुंदर नांवाचें "समुदितमदना" असें लांबलचक रूपांतर झालें; पूर्वीच्या "मेघावली" ह्या "उमरखय्यामच्या रुबायां"च्या भाषांतरामुळे अतिपरिचित नांवाचा "वंशमणि" बनला; "जलधारा"च्या ठिकाणीं "धवलचन्द्रिका" हा विरोध आला; आणि "साकी"ला गौणत्व येऊन, तिचें सुंदर उदाहरण नष्ट होऊन तेथे "लवंगलता" असें संस्कृत नामाभिधान प्रविष्ट झालें. "ओवी—अभंगां"ना गीतें मानून त्यांची उचलबांगडी झाली आणि त्यांच्या जागीं गद्य "देवद्वार" उभें केलें. प्रस्तुत समीक्षकाला असें वाटतें की, त्यांनी पूर्वींचींच नांवें ठेविलीं असतीं तर हा नीरस घोटाळा झाला नसता. गिरीश—यशवंतादि कवींनी 'साकी' समजाति मानून दीर्घ काव्यासाठी उपयोजिली आहे; तेव्हा "लवंगलते" ऐवजी तेंच नांव ठेऊन विषम जातीला "वि-साकी" असें कांही नांव देणें योग्य होतें. तसेंच "ओवी—अभंग" हीं नांवेंहि अशींच भेद दर्शवून वापरणें बरें झालें असतें. आणखी "समुदितमदना" असें नवीन नांव दिल्यावर पूर्वीचें "सूर्यकान्त" हें नांवहि छापून व्यर्थ विस्तार जर करावयाचा होता तर केवळ तीं पूर्वींचींच नांवें छापणें सयुक्तिक झालें नसतें का ! त्याचप्रमाणे स्यांच्याचसारख्या श्रेष्ठ आङ्ग्ल छन्दःशास्त्रज्ञाने मानलेला साहित्यांतील प्रघात यांनी पाळला असता तर उचित झालें असतें. प्रा. सेण्टस्बरींनी व्यक्तिगत कवींच्या कामगिरीवरून त्यांच्या नांवाने रूढ असलेल्या त्यांच्याहून जुन्या पद्यांचीं तींच तीं नांवें स्वीकारिलीं आहेत. चॉसर—स्पेन्सर हे जुने कवि आणि बर्न्स्सारखे आधुनिक कवि यांच्यावरून रूढ झालेलीं नांवें—"चॉसेरियन् स्टॅन्झा", "स्पेन्सेरियन् स्टॅन्झा", "बर्न्स् मीटर"—जशीं त्यांनी स्वीकारिलीं तशींच, "वैनायक" जातीसारखीं नांवें जर प्रा. पटवर्धनांनी स्वीकारलीं असतीं

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
महाराष्ट्र साहित्य परिषद

तर औचित्याला धरूनच झालें असतें. स्वतः रूढ केलेलीं पण जुनीं नांवें—"सूर्यकान्त" सारखीं— जर नव्या नांवांसह दिलीं आहेत, तर दुसऱ्यांनी रूढ केलेलीं नांवेंहि स्वीकारण्यास प्रत्यवाय नको होता. अशा रीतीने बऱ्याच ठिकाणी नियमांच्या चौकटीमुळे लोकांची अभिरुचि आणि कवींचा योग्य मान यांचा अधिक्षेप दुर्दैवाने केला गेला आहे.

जातां जातां अेक सूचना करावीशी वाटते. ग्रंथाचा विस्तार फार आणि पारिभाषिक संज्ञाहि अनेक असल्यामुळे प्रा. सेण्टस्वरींनी जसा अेक संज्ञाकोश आपल्या ग्रंथाच्या अन्ताला जोडला आहे तसा जोडल्यास फार अुपयोगी होअील. प्रस्तुत समीक्षकाला अेका अभ्यासकाने 'यति', 'विराम', 'खटका' यांतील अंतर न कळल्यामुळे केलेला घोटाळा माहीत असल्यामुळे, तात्कालिक अुपयोगासाठी असा लघुकोश अवश्य आहे असें वाटतें. तसेंच, "नग्न सौन्दर्य", "नक्राश्रु"सारख्या शब्दांवर परकी वाक्प्रचार म्हणून कठोर प्रहार करणाऱ्यांनीच "गाण्याचा कान" म्हणतांना जराहि कान हलवूं नये, हें विसंगत वाटतें; तद्वत् कांही अवतरणांतहि चुकीची अुपपत्ति स्वीकारल्यासारखी दिसते. भरताच्या नाट्यशास्त्रांतील (२१/१) "अितिवृत्तं तु काव्यस्य शरीरं परिकीर्तितम्" या अवतरणांत "वृत्त" म्हणजे "अितिहास" किंवा "कथानक" "अशा प्रकारें (अिति) वृत्त (पद्यरचना)" असा अर्थ नाही. तरी पण संदर्भ सोडल्यास वरीलप्रमाणे अर्थनिष्पत्ति शक्य आहे हें मात्र खरें.

—ना. ग. जोशी

अर्वाचीन मराठी गद्याची पूर्वपीठिका

(लेखक आणि प्रकाशक—श्री. गंगाधर बाळकृष्ण सरदार, १९९(१०) सदाशिव, पुणें २; मूल्य रु. ३)

"...There are numberless attempts without success ... between the first rudiments of an art and its almost perfection, between the outlines of a shadow and the picture of an Apelles. Leisure is required to go through the tedious interval, to join the experience of the predecessors to our own, or to enlarge our views by building on the ruined attempts of former adventures.

—*Goldsmith*

"कलेची प्रथमावस्था आणि तिचा परमोत्कर्ष, प्रारंभीचें छायारेखन नी अन्तींची मदनाकृति" यामधील दुवे सांधण्याचें काम कंटाळवाणें तर खरेंच, पण, गोल्डस्मिथने म्हटल्याप्रमाणे, "पूर्वगामी लेखकांच्या धाडशी प्रयत्नांचें यथार्थ आकलन करून आपली दृष्टि विशालविण्यास" तें अत्यंत अवश्य आहे. श्री. सरदार यांनी हें अवघड काम करून अेक मोठी कामगिरीच केली आहे. "मराठी गद्य वाङ्मयाच्या बाल्यावस्थेंत ज्या अनेक व्यक्तींनीं त्याचें संवर्धन केलें, त्यांची स्मृति महाराष्ट्रीयांच्या अंतःकरणांत निरंतर जागृत ठेवावी," या अुदात्त भावनेने लिहिलेला हा ग्रंथ अत्यंत यशस्वी झाला आहे. पक्ष-धर्म-निरपेक्ष दृष्टीने त्यांनी केलेलें खिस्ती नी समाजसुधारक लेखकांचें गुणग्रहण हृदयंगम झालें आहे. 'मवाळ' म्हणून हेटाळल्या गेलेल्या सुधारकांच्या तत्कालीन अग्रणींचा—'लोकहितवादी' श्री. गोपाळराव देशमुखांचा—अुतारा त्यांच्या स्वदेशीवरील तेजस्वी विचारसरणीचा अुत्तम नमुनाच आहे.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
महाराष्ट्र साहित्य परिषद

ग्रंथांतील 'सामान्य निरूपण', निबंध, नियतकालिकें, सामाजिक वाङ्मय, भाषाप्रपंच, हे भाग विशेष महत्त्वाचे आहेत. खिस्ती वाङ्मयावरील स्वतंत्र प्रकरण आवश्यक आहे. सामान्य निरूपणांत सन १८०० ते १८७४ या कालाचे चार भाग पाडलेले दिसतात. १८०० ते २२ मिशनरी प्रयत्न, १८२२ ते ३६ सरकारी नी निमसरकारी प्रयत्न, १८३६ ते ५७ लोकप्रयत्न—सामाजिक, शास्त्रीय लेखन, आणि १८५७ ते ७४ साहित्यवृद्धि—निबंध मालेची पार्श्वभूमि. या भागांतील विवेचन हीच लेखकाची वैयक्तिक कामगिरी आहे. आणि आंतील विधेयें सामान्यतः मान्य होण्यासारखींच आहेत.

निबंधादि विभाग हा अतिशय महत्त्वाचा आहे. मराठीच्या पहिल्या अभियुक्त गद्य ग्रंथाच्या—निबंधमालेच्या—पूर्वकालीं प्रबंधलेखनाचा जो प्रारंभ झाला तो नंतरच्या प्रवाहासारखाच द्विमुखी होता. पुढे जरी चिपळूणकरसंप्रदायांत टिळक, शिवरामपंत, केळकर आदि समर्थ भाषाप्रभु निर्माण होऊन त्याला फार महत्त्व आलें तरी बाळशास्त्री जांभेकर नी भाऊ महाजन यांनी प्रारंभिलेल्या लेखनकार्याला श्री. लोकहितवादींनी नीटस रूप दिलें आणि त्यांतूनच आगरकर-कोल्हटकरादि श्रेष्ठ लेखक उदयास आले. आणि अशी ही परंपरा ज्या उगमांतून निघाली तो उगम मिशनरी लोकांच्या प्रचारकी लेखनांत आपणांस सांपडतो.

'नियतकालिकें' हा भागहि वास्तविक वरील भागाचाच पूरक आहे. तेव्हा तो अन्तीं न घालतां 'निबंध'प्रकरणानंतर लगेच घालणें अधिक उचित झालें असतें, आणि 'संकीर्ण वाङ्मय' या भागानंतर तो छापल्यावरून असें वाटतें की, हा भाग स्वतंत्र देण्याची कल्पना फारच उशिरा जाणवली. कांही असो, पुढील आवृत्तीचा सुयोग आल्यास तींत हा भाग 'निबंध'विभागानंतर छापणें सयुक्तिक होईल.

'कथात्मक वाङ्मय' आणि 'नाटकें' हे विभाग त्या त्या वाङ्मयप्रकाराच्या प्रथमावस्थेची यथार्थ कल्पना करून देतात. कल्पित—अद्भुतरम्य—भाषांतरी अवस्थेंतूनच हरिभाऊ-वामनराव फडके निर्माण झालेले आहेत. तसेंच शेक्सपीअरीय नाट्यतंत्राचा अति हृदयंगम नी उत्कट उपयोग ज्यांच्यांत पराकोटीला गेला ते प्रतिभाशाली राम गणेश गडकरी म्हणजे गद्याच्या या बाल्यावस्थेंत शेक्सपीअरच्या भाषांतरद्वारा झालेल्या परिणामाचा परमोत्कर्ष होय. स्वाभाविकपणेंच ह्या दोन्ही प्रकारांतील वाङ्मय हें परोपजीवी होतें.

भाषाप्रपंचाचा विभागहि अशा रीतीनेच आजच्या कोशयुगाची पूर्वस्थिति दर्शवितो. अनेक पंडितांना एकत्र आणून कोशादि प्रचंड कार्ये करण्याची 'ज्ञानकोश'कारांची यशस्वी प्रथा या कालांतहि आढळते आणि आजच्या प्रौढ मराठी भाषेच्या मूळाशीं जर कोणाचे प्रयत्न असतील तर ते तत्कालीन संस्कृतज्ञ पंडितांचेच. याच भागाचा विस्तार थोडा वाढवून श्री. सरदार यांनी त्या वेळच्या भाषापद्धतीविषयी विवेचन केलें असतें तर ग्रंथाला पूर्णता येण्यास सहायभूत झालें असतें. मिशनरी—सरकारी लेखनांत फार्सीमिश्र जुनी मराठी वापरण्याकडे कल दिसतो. उलट नंतरच्या पंडिती लेखनांत फार्सी शब्द न वापरतां संस्कृत शब्द वापरण्याकडे * वृत्ति कललेली आढळते. शास्त्रीमंडळींच्या मराठी कोशाच्या प्रस्तावनेंत खालील उतारा आढळतो:

---

* यामुळेच "कथिणें" यासारखे संस्कृत धातु वापरण्याचा प्रघात होता (पृ.२४१). श्री. सावरकर यांनी ही गोष्ट स्पष्ट केली असतांहि श्री. चौकर आणि प्रा. फडके त्यांच्यावर विनाकारण दोषारोप करितात. श्री. हरिभाऊंनी हेंच उदाहरण पुढे गिरविलें. हें केवळ आंग्लानुकरण नाही, त्याला आपली परंपरा आहे.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
महाराष्ट्र साहित्य परिषद

'यावनी भाषेंतील शब्द...साधारण व्यवहारीं सरासरी बरे दिसतात, परंतु शास्त्रीय व्यवहारासाठीं प्रौढ म्हणून जी भाषा तींत तर अगदींच शोभत नाहींत. याकरितां प्रौढ भाषेंत ते शब्द घेऊं नयेत.'

या संस्कृतनिष्ठेमुळेच फार्सीमिश्रण संपुष्टांत आलें, अिंग्रजीमुळे नाही, असा अभिप्राय "महाराष्ट्र शब्दकोशांत" (भाग ५) संपादकांनी व्यक्त केला आहे. संस्कृतप्रमाणेच कोंकणी वळणाचाहि परिणाम तत्कालीन भाषेवर झालेला दिसतो. मुद्रणकलेसंगेंच विरामचिन्हेंहि याच कालांत वापरण्यांत येअूं लागून अर्थबोध स्पष्ट होअूं लागला. हा अर्थातच अिंग्रजी भाषेचा परिणाम आहे.

अशा प्रकारची ही पूर्वपीठिका अैतिहासिक टीकापद्धतीचा अेक चांगला नमुना होअून बसली आहे. 'अर्वाचीन गद्या'प्रमाणेच 'अर्वाचीन पद्यां'ची पूर्वपीठिकाहि लेखक वर्णितील तर ते दोन्ही ग्रंथ तत्कालीन समग्र मराठी वाङ्मयावरील अधिकृत ग्रंथ होतील. किंवा पद्याचा विस्तार त्या कालीं फारसा नसल्यामुळे पुढील आवृत्तींत पद्याच्या प्रगतिपर अेक स्वतंत्र प्रकरण समाविष्ट केल्यास तो ग्रंथहि 'मराठी वाङ्मयाची पूर्वपीठिका' कळण्यास अुपयोगी होअील. श्री. सरदार हे त्या कार्यास सर्वथैव योग्य आहेत हें त्यांनी या ग्रंथावरून दाखविलेंच आहे.

—ना. ग. जोशी

गगनाला गवसणी

[ले० विष्णु गणेश भिडे; प्र० य. गो. जोशी, ६२३।१५ सदाशिव पेठ, पुणें २; किं. १॥ रु.]

या संग्रहांत २२ लघुकथा आहेत. त्यांचे विषय विविध असल्याने, वाचकाला नवीन नवीन समाजक्षेत्रांतून वावरल्यापासून चांगला विरंगुळा वाटतो. लेखक एक तरुण महाविद्यालयीन विद्यार्थी असल्याचें कळून तर त्याच्या सूक्ष्म समाजावलोकनाच्या व्यासंगाचें कौतुक करावेंसें वाटतें. वाष्कळ शृंगारविनोद, शिव्या अि. ची कास त्याने धरली नसून, विशेषतः ग्रामीण आणि कृषिजीवनविषयक व्यवहाराच्या चित्रणावर भर दिला आहे. 'अप्सरा' या गोष्टींत पश्चिम खानदेशांतील पावरा जातीच्या भिल्लांची जी माहिती आढळते ती पुष्कळांस नवीन वाटेल. समाजशास्त्राभ्यासास तिचा अुपयोग आहे. 'दोन त्रिलंदर' या गोष्टींत अेकमेकांवर मात करण्याची दोन लबाडांची जी खटपट दाखविली आहे ती मनोरंजक तर आहेच, पण बुद्धीची कसरतहि आहे. खेड्यांतील अशा गोष्टींचा संग्रह श्री. भिडे यांनी जरूर करावा, अशी त्यांस सूचना करतों.

गोष्टीला आरंभ करण्याची लेखकाची पद्धत—सहज चाललेल्या संभाषणांतून कथासूत्र निर्माण करावयाची—जिव्हाळा उत्पन्न करणारी आहे. या कामीं त्याने 'पात्रमुखी' निवेदनप्रकाराचा केलेला अवलंबहि चांगला आहे. नवशिक्या लेखक जेव्हा प्रसिद्ध लेखकांच्या कांहीं हातोटी हस्तगत करण्याचा प्रयत्न करीत असतो तेव्हा तो नेहमी साधतोच असें नाही. असेच कांहीं प्रयत्न प्रस्तुत लेखकाने केलेले दिसतात. उदा० 'जिकडे तिकडे नटींची भावभगत वाढत होती', 'दत्तूची महत्त्वाकांक्षा डिंवचली गेली होती', 'भूरीच्या अंतरांतील सुप्त भावना तरारल्या', 'पाटलाची झळाळी मालवून टाकली होती', 'मैत्रिणींच्या जंजाळांत ती नेहमीं असे,'

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
महाराष्ट्र साहित्य परिषद

इत्यादि वाक्यें माटेछाप वाटतील. संस्कृत शब्द मुद्दाम आणण्याची हौस कधी कधी हास्यास्पद होत असतेः 'सार्यसिंग याला दोन भार्या होत्या', 'सावत्र भगिनींचीं लग्नें झालीं', 'मध्यें व्याघ्र मारल्यानें त्यावर जो तो स्तुतिसुमनें उधळी.' तसेंच 'ठाकली', 'देखत होती', 'अवलोकला', 'लाधला', 'कथूं लागले' यांसारखे जुने प्रयोग आज कानाला बरे लागत नाहीत. 'लाभस', 'अभिनयनेत्री' यांसारखे नवीन शब्द आहेत. कांही शब्द चुकीच्या अर्थानेहि वापरले आहेत, व कोठे शुद्धलेखनप्रमाद दिसतात. 'हांच तो' यांत 'हा' वर अनुस्वार कशाला! तेव्हा लेखकाला आमची आग्रहाची सूचना आहे की, त्याने प्रस्तुत विद्यार्थिदशेंत भाषा कमावण्याकडे जास्त लक्ष द्यावें, संभाषणकौशल्य अंगीं आणावें, व 'हांच तो' प्रमाणे कांही तरी भरकटण्याचा मोह टाळावा. म्हणजे लघुकथालेखकांत लवकरच त्याला वरचा दर्जा प्राप्त होईल.

—चिंतामण गणेश कर्वे

फवारे

[लें. वसंत हरि कटककर] रा. कटककर हे अेक अुदयोन्मुख व होतकरू लेखक आहेत, हें साधारणतः पुष्कळ वाचकांना माहीत असेलच. कारण, त्यांच्या नाट्यछटा, लघुकथा वगैरे मधून मधून, प्रमुख मासिकांतून व साप्ताहिकांतून प्रसिद्ध झालेल्या नेहमी पाहण्यांत येतात. अशा प्रकारें आतापर्यंत फुटकळ रीतीने प्रसिद्ध झालेल्या नाट्यछटा, लघुकथा व विनोदी लेख यांपैकी निवडक नमुन्यांचा संग्रह प्रस्तुत 'फवारे' या पुस्तकांत रा. कटककर यांनी प्रथित केला आहे. अेकंदर संग्रह वाचून पाहतां, रा. कटककरांच्या ठिकाणीं वाङ्मयलेखनाची हातोटी व पात्रता ही बऱ्याच अंशीं निसर्गसिद्ध असल्याचें दिसून येतें; त्यांची निरीक्षणशक्तिहि सूक्ष्म व मार्मिक असून, व्यंगपूर्ण विनोदहि चांगला साध्य झालेला दिसतो. विशेषतः कुटुंबांतील घरगुती संभाषणें, व वोहारणी, हॉटेलवाले, सिनेमावाले, 'कसलेलीं' किंवा 'पट्टीचीं' गिऱ्हाअिकें, वगैरेसारख्यांचीं ठरीव ठशाचीं, धंदेवाअीकपणाचीं पण आपापल्यापरी चाणाक्ष व धूर्ततापूर्ण अशीं लाघवी भाषणें, अि. त्यांस चांगलीं साधतात असें त्यांच्या कांही नाट्यछटा (अुदा. ना. छ. १—वोहारणीचा सवदा; ना. छ. ५—फारच आळशी बुवा तूं!; ना. छ. २२—बाअी मला नाही हो चालायचं! अि.) व शेवटचीं दोन व्यंगचित्रें, यांवरून ठळकपणें दिसून येतें. रा. कटककर यांच्या 'नाट्यछटा' या 'नाट्यछटे'च्या चौकटींत बसतात कीं नाहीत—किंबहुना त्या 'नाट्यछटे'च्या तंत्रांत बसतच नाहीत अशा आशयाचे कांही अभिप्राय आमच्या पाहण्यांत आले होते. तेव्हा येथे त्यासंबंधी आमचेहि विचार, सहज ओघानुसार व्यक्त करणें आम्हांस सयुक्तिक दिसतें. असें करण्याचें आणखी अेक विशेष कारण आहे. तें हें की, आम्ही प्रदर्शित करणार असलेले विचार अितरांच्या मताहून कांहीसे भिन्न आहेत व त्यांकडे निरभिनिवेशी साहित्यिकाचें लक्ष वेधणें आम्हांस अवश्य वाटतें.

"नाट्यछटा" हा अेक लहानसा व मार्मिक लेखनप्रकार आहे; यांत शंका नाही. परंतु त्याच्या 'विधाना'चें (technique) 'पथ्य' सांभाळण्यांत लागणाऱ्या सावधानतेच्या व परिश्रमांच्या तुलनेने, अशा निर्मितीचें महत्त्व खऱ्या वाङ्मयांत केवळ दुय्यम दर्जाचेंच आहे. म्हणूनच हा लेखनप्रकार होतकरू व अननुभवी लेखकांना सकृद्दर्शनी जितका मोहक वाटतो,

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
महाराष्ट्र साहित्य परिषद

तितकाच तो, त्या लेखनप्रकाराच्या भोंवतीं असलेल्या निर्बंधरूपी काटेरी तारेच्या कुंपणाच्या करवतीमुळे सहजसाध्य नाही; किंबहुना या प्रकाराचे अिंग्रजी वाङ्मयांत सुद्धा असलेल्या महत्त्वापेक्षाहि आपल्या अिकडे त्याचा वाजवीपेक्षा जास्तच बोलबाला व प्रस्थ माजविण्यांत आलें आहे, असें आमचें स्पष्ट मत आहे. म्हणून रा. कटककर यांच्या 'नाट्यछटा' या जरी तंत्रमंत्रदृष्ट्या त्या नांवास साजेशा नसल्या तरी त्यांत फारसा कमीपणा मानण्याचें कारण नाही. अशासारख्या स्फुटप्राय लेखनास आमच्या मतें 'ओझरतीं दृश्यें' किंवा 'धावतीं चित्रें' असें कांही नांव देणें अधिक अर्थवाहक होअील.

रा. कटककर यांच्या लघुकथांतहि, यथार्थस्वभावदिग्दर्शन व वस्त्वादर्शी प्रासंगिक वर्णनें चांगलीं प्रतिबिंबित झालेलीं दिसतात. सारांश रा. कटककर यांचे 'फवारे' अेकंदरीने आल्हाददजनक आहेत असें आमचें मत आहे. रा. कटककर यांच्या हातून अधिकाधिक सरस वाङ्मयकृति निर्माण होत राहोत व त्यांच्या अंगच्या स्वाभाविक गुणांचा आनंददायक विकास होअून त्याचा पूर्ण आस्वाद रसिक वाचक वर्गाला नेहमी मिळत राहो असें आम्ही अिच्छितों.

—श्री. नि. चापेकर

साभार स्वीकार

१ पेशवाईच्या सावलींत— लेखक : श्री. नारायण गोविंद चापेकर; प्रकाशक : श्री. ल. ना. चापेकर, आर्यसंस्कृति मुद्रणालय, पुणें २; मूल्य ४ रु.

२ मराठी नाटयछटा— लेखक : प्रो. शं. के. कानिटकर; प्रकाशक : श्री. म. के. कानिटकर, ५९५ बुधवार, पुणें; मूल्य ८ आणे.

३ फवारे— [नाटयछटा, लघुकथा, विनोदी लेख यांचासंग्रह] लेखक : श्री. व. ह. कटककर; प्रकाशक : एन्. टी. भिडे, मॉडर्न बुकडेपो; पुणें; मूल्य १। रु.

४ लेनिन— लेखक व प्रकाशक : श्री. वि. म. भुस्कुटे, १०६ (८५) सदाशिव पेठ पुणें २; मूल्य २ रु.

५ गगनाला गवसणी— (कथासंग्रह)— लेखक : श्री. वि. ग. भिडे; प्रकाशक : य. गो. जोशी, ६२३।१५ सदाशिव, पुणें; मूल्य १॥ रु.

६ व्यावहारिक ज्ञानकोश— (भाग ३ रा) प्रकाशक : श्री. गं. र. भिडे, मॅनेजिंग डायरेक्टर, व्यावहारिक ज्ञानकोश मंडळ, लिमि. कोल्हापूर; मूल्य १० रु.

७ शिव-चरित्र-वृत्तसंग्रह (१ ला खंड-कानडीविभाग) अनुवादक : श्री. पां. भी. देसाई; प्रकाशक : चिटणीस, भा. इ. सं. मंडळ, पुणें २; मूल्य १ रु.

८ संध्यारंग— लेखक : श्री. श्री. शं. जुन्नरकर; प्रकाशक : कृ. ना. सापळे, रामकृष्ण प्रकाशनमंडळ, त्रिभुवनरोड, मुंबई ४; मूल्य १। रु.

९ पालीभाषा विद्यार्थी-संमेलन, पुणें १९३८ (स्मारक-ग्रंथ)—लेखक : श्री. कृ. भा. बापटे; प्रकाशक : वि. रा. निमकर.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
महाराष्ट्र साहित्य परिषद

चर्चा

(१)

वैनायक-वृत्तविचार

महाडजवळील नागांवचे (जि. कुलाबा) वयोवृद्ध पितामहसदृश व्यासंगी "आजीव विद्यार्थी"– प्रा. मा. त्र्यं. पटवर्धनांनी यांचें असें वर्णन केलें आहे—श्री. भिकाजी वामन जोशी यांनी माझ्या वरील मथळ्याच्या* लेखावर दोन टीकात्मक पत्रें पाठविलीं पण तीं फार लांबलचक असल्यामुळे त्यांतील मूळ मुद्यांचाच, शक्यतो अवतरणें देअून, मी अुल्लेख करीत आहें. त्यांच्यावरील माझें मत मीं पुढे व्यक्त केलें आहे. श्री. भिकाजीपंतांनी ८० च्या घरांत असतांहि आम्हा तरुणांना लाजवील अितक्या अुत्साहाने मीं पाठविलेल्या लेख-प्रतीचें विस्तृत अवलोकन करून मला उपकृत केलें आहे.

श्री. भिकाजीपंतांचें म्हणणें : (१) सावरकरांनी हें वृत्त नवीन निर्माण केलें नाही. "फार प्राचीन काळीं होअून गेलेला जो प्रसिद्ध शाहीर सगनभाअू यांनी अेक लावणी...केलेली मला आठवत आहे—

"वामनेत्र आज सखे लवूं लागला इ०"
–॰–॰–॰ ॰–॰––॰+

(२) सोड सोड सोड अतां जानकी मला
आज कर्मचांडाळहि हाच जाहला ॥

"वरील पद्य कै. परशरामपंत तात्या गोडबोले यांनी संस्कृत अुत्तररामचरिताचें मराठींत भाषांतर केलें आहे त्यांत दिलें आहे. आणि तें सावरकरांच्या मराठी शिक्षणाच्या वेळच्या पांचवी किंवा सहावीच्या क्रमिक पुस्तकांत असलेलें त्यांस पाठ झालेलें होतें तें त्यांस अंदमानचे कैदेंत आठवून या पदाचे चालीवरच वैनायक वृत्त केलें आहे खास..."

(३) "चामरवृत्ताच्या चरणाच्या शेवटच्या ३ मात्रा कमी केल्या असतां वैनायक वृत्त तयार होतें..."

(४) "छंदोरचनेंत (पटवर्धनकृत) वैनायक चालीवरील ... १०।१२ वृत्तेंच आहेत. त्यांचें वाचन दांडगें व स्मृति दांडगी असल्यामुळे त्यांस अेखादें वृत्त आठवलें असेल व त्यावरून स्वतः नवें तयार केलें असें म्हणत आहेत. ज्या कृतींत दुसऱ्याच्या कृतीचें अगदीं अल्पस्वल्प अनुकरण केलें असल्याचें आढळून आल्यास त्यास त्या कृतीचें पेटंट मिळत नाही हें आपणांस माहीत आहेच."

(५) "गरुडासारख्या भराऱ्या मारणाऱ्या वृत्तास अन्वर्थक नांव "वैनतेय" असें

---

* महाराष्ट्र साहित्य पत्रिका, चैत्र शके १८८०.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
महाराष्ट्र साहित्य परिषद

शोभलें असतें... सावरकरांस वैनायक वृत्ताचे "शोधक" म्हणतां येईल. ते निर्माते होऊं शकणार नाहीत. ...या वृत्तास ('सगन'चें तें) 'सागन वृत्त'च म्हणावयास हवें."

(६) "सावरकर वैनायकास 'वृत्त' म्हणतात, म्हणून आपणहि त्यास 'वृत्त' व 'छंद' म्हणत आहांत... ती 'जाति' आहे. त्यास "वामनेत्र" जाति किंवा "जानकी" जाति (तात्यांच्या पदावरून) म्हणावें."

(७) कलापति (७००), कांचनकांति (७५८), धवल (७६१), पद्मावती (४६६) पासून 'वलना' (४५१) पर्यंतची अशी ९ 'वृत्तें' वैनायकाच्याच 'जाती'चीं आहेत.

(८) पुढील खुलासा दुसऱ्या पत्रांत आहे : "प्रो. माधवरावजींच्या नवीन छन्दोरचनेंत 'गुल्वंकी'च्या जातीचीं ... अनेकविध वृत्तें आहेत ... 'गुल्बंकी'च्या चरण लगावलीचें "चंचला" वृत्तही आहे (ट. २९५)."

गुल्वंकीसारखीच वृत्तें:— कलिंनंदिनी, चंचला, श्रीलीला, मनोमोहिनी, रंगराग, इंदुमुखी, प्रमाथिनी, मणिबंध, मानसभेजनी.

आता मी वरीलपैकी अेकेकाचा विचार करतोंः—

(१) नी (२) संशोधनाच्या दृष्टीने यांना महत्त्व आहे. पण याच्याहि पूर्वीचें पद— गोविंद वणीकरांचें— सांपडलें असल्याचें श्री. मा. त्र्यं. पटवर्धनांनी मला व्यक्तिशः आणि आपल्या पुस्तकांतहि लिहिलें आहे. तेव्हा सगनभाअूचा यासंबंधीचा अधिकार आपोआप जातो.

(३) ते (५) "पेटंट"चा दंडविधानांतील दृष्टान्त साहित्याच्या जगांत लागू नाही. मीं पूर्वीच माझ्या लेखांत चॉसर नी स्पेन्सरचीं अुदाहरणें देअून माझें म्हणणें स्पष्ट केलें आहे. आणखी अुदाहरण अिंग्रजी वाङ्मयांतील "बर्न्सवृत्ता"चें. प्रा. सेन्ट्सबरी म्हणतात:— "हें नांव (बर्न्स या) स्कॉटिश कवीने त्यावरील दाखविलेल्या प्रभुत्वामुळे मिळालें आहे" ('मॅन्युअल ऑफ् अिंग्लिश प्रॉसडी', पृ. २७३). "तरी पण तें याहून फार जुनें आहे, कारण त्याच्या खुणा ११ व्या शतकापर्यंत मागें मिळत आहेत." अगदी याच तत्त्वाप्रमाणे "वैनायक" हेंच नांव योग्य आहे. पहिल्या च्छेदकांत सांगितल्याप्रमाणे हें "सागन"वृत्त होअूं शकणार नाही.

(६) मीं या संबंधांत वापरलेला "वृत्त" वा "छंद" शब्द अिंग्रजी 'मीटर' किंवा श्री. न. चिं. केळकरांनी सुचविलेला आणि श्री. पटवर्धनांनीहि वापरलेला "पद्य" शब्द या अर्थी वापरला आहे. पारिभाषिक शब्द अर्थात् "जाति" हाच आहे. पण ती "वामनेत्र" वा "जानकी" जाति नव्हे. ती "धवलचन्द्रिका" (पटवर्धनांच्या मताप्रमाणे) आहे. मी मात्र त्यास "वैनायक" जाति असेंच म्हणेन. कारण वरील कारणांसाठी तें अुचित आहे आणि तसें रूढहि झालें आहे.

(७) नी (८) यांसाठी मी श्री. भिकाजीपंतांचा विशेष आभारी आहें. ७ मधील वृत्तें मात्राक्षरनियमित "वृत्तें"च आहेत पण "वैनायक" 'जाति' म्हणजे केवळ मात्रानियत आहे. प्रत्येक भृंगांतील सहा मात्रांची योजना विविध होईल आणि ती प्रत्येक योजना स्थिर केल्यास तितकीं "वृत्तें" होतील. (मधील अुदाहरणें विचारणीय आहेत. पण प्रत्यक्ष योजून तीं दीर्घ काव्यासाठी किती योग्य आहेत तें पाहिलें पाहिजे. अर्थात् 'गणनियत' 'वृत्ता'पेक्षा 'जाति' रचना अधिक अुपयोगी होईल असें वाटतें.)

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
महाराष्ट्र साहित्य परिषद

वरील विवेचनावरून श्री. भिकाजीपंतांच्या आणि अितरांच्याहि शंकांचें समाधान होअील अशी आशा आहे. वैनायकाच्या मूलोत्पत्तीची माझी भूमिका मीं वर अुल्लेखिलेल्या लेखांत अेक अनिष्ट टीप देअून स्पष्ट केली आहे, ती यासंगेच वाचकांनी वाचावी अशी विनंती आहे, म्हणजे अनिष्ट समजूत होणार नाही.

ना. ग. जोशी

(२)

कुडाळी म्हणी

महाराष्ट्र-साहित्य-पत्रिकेच्या अेप्रीलच्या अंकांत श्री. वर्दे यांनी माझ्या लेखावर आक्षेप घेतले आहेत. मी अप्रस्तुत अितिहासाचा अुल्लेख केला असें ते म्हणतात. त्याचप्रमाणे माझ्या लेखाशीं अेका अप्रस्तुत अशा वादाचा त्यांनी संबंध जोडला आहे. त्यांनी रा. ब. वासुदेव अनंत प्रभु बांबर्डेकर, व श्री. रामकृष्ण विठ्ठल मतकरी, एम्. ए., एल्.एल्. बी., बी. टी., यांचा अुगीच माझ्या लेखाशीं संबंध जोडला आहे. दोन्ही लेखक खंदे विद्वान, अितिहासज्ञ असे असल्यामुळे ते अुत्तरें देतीलच. तसेंच श्री. वर्दे यांनी म्हणींविषयी जो भाग सुचविला त्यांतील मला ग्राह्यांश कोणता तेंहि मी महाराष्ट्र-साहित्य-पत्रिकेकडे आणखी म्हणी पाठविल्या आहेत त्या प्रसिद्ध झाल्यावर लिहीन.

मीं दिलेला अितिहास श्री. वर्दे यांस अप्रस्तुत आहे असें वाटतें. पण ज्या ठिकाणीं मीं तो दिला आहे तेथे त्या म्हणी अितर प्रान्तांतील लोक वाचणार व त्यांस कांही भाग समजण्यास अडचण पडूं नये, ह्याचसाठी दिला आहे. अुदाहरणार्थ 'वामण' हा शब्द कोणास लावतात, हें मीं कागदांचा व दंडाचा अुल्लेख करून सिद्ध केलें यांत बिघडलें कुठे !

फक्त वादाच्या मुख्य मुद्द्याचा विचार करूं. श्री. वर्दे यांच्या मतें या म्हणींस कुडाळी न म्हणतां मालवणी म्हणावें, व त्यांस कुडाळी हा शब्द मुळीच लावूं नये. निदान 'कुडाळी' या शब्दाचा प्रचार होअूं नये. मीं ज्या म्हणींची चर्चा केली आहे त्यांना सदृश अशी भाषा मालवण तालुका, वेंगुर्लें तालुका, साळशी महाल व सावंतवाडी संस्थान यांत चालू आहे. ह्या भागांत मालवण जसें बंदर आहे तसेंच वेंगुर्लें हेंहि एक बंदर आहे. म्हणून श्री. वर्दे यांच्या विचारसरणीप्रमाणे तिला वेंगुर्ली म्हणणेंहि योग्य होअील, किंवा सावंतवाडी शहर हें ह्या विभागाचा मोठा भाग जें सावंतवाडी संस्थान त्याचें केंद्र असल्यामुळे या प्रान्तांतील बोलीस सावंतवाडी बोली असें म्हणणें युक्त होअील. पण भाषेचें नांव हें परंपरेने येत असतें. अुदाहरणार्थ महाराष्ट्राचे जिल्हे मध्यप्रान्त व मुंबअी अिलाख्यांत असून पूर्वीच्या अेका प्रान्तावरून तें नांव रूढ झालें. त्याचप्रमाणे हे तालुके व संस्थान यांस पूर्वी कुडाळ प्रान्त म्हणत हें श्रीमठ संस्थान दाभोली येथील आज्ञापत्रांच्या परंपरागत मायन्यांवरून व वाडकर सावंत यांच्या कागदांवरून दिसून येतें. दाभोली हा संस्थानाबाहेरील गांव आहे. "कसबा कुडाळ येथे आमचा संस्थानचा अधिकार हाली जसा वाडीस आहे तसा चालत होता."

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
महाराष्ट्र साहित्य परिषद

या गणेश दादाजी प्रभु देसाअी यांच्या अर्जातील शब्दांवरून कुडाळ केंद्र होतें असें दिसून येतें. त्याच कागदांत "आमचे वडिलांस देसाअी प्रान्त कुडाळ" असें म्हटल्याचें गणेश प्रभु देसाअी लिहितो. त्याला मालवणची अिनामत होती (पाहा— मठगांवचा शिलालेख परिशिष्ट, लेखांक १८). यावरून कुडाळ प्रान्त होता, व त्याचें केंद्र कुडाळ होतें हें दिसतें. आता या भाषेस 'कुडाळी' म्हणतात काय तें पाहूं. "The original language used in the state by Hindus excepting the higher classes, is impure Marathi, and was termed **Kudalee,** from its being peculiar to the district of that name and to the southern Taluka of the Ratnagiri collectorate."— Bombay Govt. Records No. X. ह्या अुताऱ्यावरून माळवणी हें नांव परंपराप्राप्त व सरकारमान्य नसून परंपरा व सरकार यांचा शिक्का 'कुडाळी' या नांवावर बसला आहे हें श्री. वर्दे यांस पटेल. मालवण हें त्या प्रान्ताचें केंद्र कधीच नव्हतें व आजहि नाही. कुडाळ प्रान्तच होता अेवढेंच नव्हे तर तो देशहि होता असे "कुडाळदेशकर ब्राह्मण" या शब्दावरून दिसतें. तसेंच त्यांच्यामध्ये ३६० गांवांचा समावेश होत होता हें आद्यगौड ब्राह्मण द्वैमासिक वर्ष १ अंक १।२, कोंकणच्या अितिहासाचीं साधनें नं. ७८ यांतील नोंदीवरून कळतें. त्या भागांतील देवस्थानपद्धति, कुडाळी माप हीं स्वतंत्र आहेत. व त्या भागांतील भाषा गोवें भागाहून भिन्न आहे हें "बाबु मामालो फणस", "माझी वा खंय गेली!" हींच वाक्यें बदलून झालेल्या "बाबू मामाचो फणस" व "माझी आवस खंय गेली!" या वाक्यांवरून कळण्यासारखें आहे. पूर्वग्रह सोडून श्री. वर्दे यांनी महाराष्ट्र-साहित्य-पत्रिकेच्या जानेवारी १९३२ च्या अंकांतील कुडाळी भाषेवरची चर्चा जर वाचली असती तर हा प्रश्न त्यांनी उपस्थितच केला नसता.

वा. रा. प्रभु

पत्रव्यवहार

कोंकणी-अहिराणी समिति

संपादक म. सा. प. यांस न. वि. वि.—

कोंकणी-अहिराणी-समितीच्या वृत्तान्तासंबंधी कुडाळ-देशकर-ब्राह्मणसमाजांतील कांही विद्वान सद्‌गृहस्थांकडून ज्या सूचना आल्या आहेत त्याबद्दल आम्ही फार आभारी आहों. त्या समाजाच्या नांवासंबंधी ज्या दुरुस्त्या सुचविल्या आहेत त्या समितीस अर्थात् मान्य आहेत. इतर बाबींचा विचार, या समितीच्या वृत्तान्ताविषयी ज्या आणखी जास्त सूचना येण्याची वाट पाहात आहों त्या आल्यावरच, एकत्र करतां येईल. अद्यापि अहिराणीसंबंधी समितीने काढलेल्या मुद्यांवर कोणाचेंच लिहून आलें नाही. तोच विषय जास्त महत्त्वाचा आहे. तेव्हा आमच्या खानदेश-बंधूंनी या बाबतींत लक्ष घालून आपले विचार कळवावेत. सर्व बाजू पुढे आल्या-नंतर समितीच्या मूळ वृत्तान्तांत अखेरचा काय फरक करावयाचा, हें ठरवितां येईल.

चिं. ग. कर्वे,
चिटणीस,
कोंकणी-अहिराणी-समिति.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
महाराष्ट्र साहित्य परिषद

संपादकीय

रियासतकारांची बल्हारी— रियासतकार रा. ब. गोविंद सखाराम सरदेसाई यांच्या ७४ व्या वाढदिवसाच्या निमित्ताने त्यांचा गौरव करण्याचें त्यांच्या मुंबईतील कांही चाहात्यांनी योजून दोन स्मारकग्रंथ त्यांना अर्पण करण्याकरिता तयार केले व ते अर्पण करण्याचा समारंभ बॅ. जयकर यांच्या अध्यक्षतेखाली नुकताच मुंबईस झाला, हें कळून आम्हांस अत्यानंद वाटला. श्री. नानासाहेब सरदेसाई यांचा महाराष्ट्र साहित्य परिषदेशीं फार जुना संबंध आहे व ते तिच्या कामांत आताशा जरी लक्ष घालीत नाहीत, तरी परिषदेबद्दल त्यांची नेहमी सहानुभूति असतेच. बडोद्यास झालेल्या साहित्यसम्मेलनाच्या पहिल्या दोन अधिवेशनांत त्यांनी प्रामुख्याने भाग घेतलेला आहे व त्यांचें नांव बहुतेक दरसाल अध्यक्षपदासाठी सुचविण्यांतहि येत असतें. यावरून त्यांची अखंड साहित्यसेवा महाराष्ट्रास किती प्रिय आहे हें दिसून येईल.

रावबहादूर सरदेसाई हे प्रामुख्याने इतिहासकार म्हणून सुप्रसिद्ध आहेत. इतिहासक्षेत्रांत त्यांनी फार मोठी कामगिरी केली असून विशेषतः महाराष्ट्राचा, नव्हे आपणा मराठ्यांचा, पूर्वीचा उज्ज्वल इतिहास त्यांनी समग्र लिहून मोठी उणीव भरून काढली आहे, यांत शंकाच नाही. आज जर शिवकालापासून तो सातारची गादी नष्ट होईपर्यंतचा सुमारें २५० वर्षांचा मराठ्यांचा—महाराष्ट्राचा इतिहास साकल्याने अभ्यासावयाचा झाला तर सरदेसायांच्या रियासतीच हातीं घ्याव्या लागतील. साने, राजवाडे, खरे, पारनीस प्रभृति विद्वानांनी जें इतिहाससाहित्य प्रसिद्ध केलें त्याचा उपयोग सामान्य वाचकांना होत नसतो; तर त्याच्या साहाय्याने तयार केलेल्या संकलनाचाच होतो, हें उघड आहे. असंख्य उपलब्ध साधनांवरून आटोपशीर सुंदर इतिहास लिहिण्याचें काम सोपें नाही, हें सरदेसायांखेरीज तें कोणीं केलें नाही यावरूनच कळून येणार आहे. असो. तेव्हा महाराष्ट्राचा एकमेव इतिहासकार म्हणून नानासाहेबांना आज मिळणारा मान यथायोग्य आहे, व त्यांचा जो आज गौरव करण्यांत येत आहे तो यापूर्वीच व्हावयास पाहिजे होता.

त्यांचें विविध वाचन, मनन, अवलोकन, संकलन आणि लेखन आज कित्येक तपें चालू आहे; त्यांनी अनेक देश पाहिले आहेत; अनेक विद्वानांशीं साहचर्य आणि सहकार्य केलें आहे; विद्यापीठांतून पांडित्यपूर्ण व्याख्यानें दिलीं आहेत; अनेक निबंध आणि ग्रंथ लिहिले आहेत; चांगला ग्रंथसंग्रह जमविला आहे; चारित्र्य निष्कलंक ठेविलें आहे; कष्ट सोसले आहेत; व पैशाचा आणि प्रसिद्धीचा लोभ धरला नाही. तेव्हा याहून अधिक कार्यक्षमता आणि विभूतिमत्व पाश्चात्य देशांत तरी शक्य आहे काय, हा प्रश्न आहे. आतापर्यंत कडीकुलुपांत सरकारने बंदिस्त ठेविलेलें पेशवे दफ्तर त्यांनी मोठ्या खटपटीने आणि मुत्सद्देगिरीने खुलें करून घेतलें व शक्य तितकी त्यांतील माहिती जनतेपुढे ठेवली. तसेंच रेसिडेन्सी रेकॉर्डचें. त्याचे पांच सहा भाग प्रसिद्ध झाले आहेत. या दोन जुन्या महत्त्वाच्या पण अफाट पेशवाई दप्तरांची छाननी आणि सारसंग्रह-प्रसिद्धि एवढ्या लवकर उरकण्याची कामगिरी नानासाहेबांखेरीज कोणाच्याने करविली नसती, हें अगदी ढळढळीत सत्य आहे.

तेव्हा रा. ब. सरदेसाई यांच्याविषयी सर्वच महाराष्ट्राला अत्यादर आहे, हें आम्ही नम्रपणें त्यांच्या निदर्शनास आणूं इच्छितों. कारण आपणांस महाराष्ट्रांतच कांही ठिकाणीं प्रबळ विरोध आहे असें ते समजतात, हें कामशेत इतिहास परिषदेवरून उघड होतें.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
महाराष्ट्र साहित्य परिषद

अनुक्रमणिका

पण त्यांच्या कार्याला कोणी विरोध करीत नसून, त्यांच्या विशिष्ट कार्यपद्धतीवर कांही जण सद्धेतूनेच टीका करतात, इतकेंच. तेव्हा कामशेत येथे एक इतिहाससंशोधनमंदिर स्थापण्याचें त्यांनी जें योजिलें आहे तें योग्य नाही, असें अनधिकारानेहि आम्ही म्हणण्याचें धाडस करतों. धुळ्यास ज्याप्रमाणे अशीच एक संस्था निघाली पण कार्य तितकेंसे रेटलें जात नाही, हें कटु सत्य आम्हांस बोलावें लागत आहे; तसेंच श्री. सरदेसाई यांच्या मागे कामशेतमंडळाचें होईल, किंबहुना ती संस्था नांवाचीच राहील, अशी आम्हांस प्रेमापोटीं पण साधार चिंता वाटत आहे. त्यापेक्षा आपला एक विश्वस्तसंघ (ट्रस्ट) निर्माण करून, त्याच्या अटींप्रमाणे व्यवस्था करण्यासाठी जमविलेला ग्रंथसंग्रह आणि निधि, सध्या आहे त्याच भारत-इतिहास-संशोधक मंडळाच्या हवालीं करावा व विश्वस्तांनी त्यावर करडी देखरेख ठेवावी. कांही झालें तरी मंडळाला मोठी परंपरा आहे व त्याला आता स्थैर्यहि आलें आहे. तेव्हा तीच महाराष्ट्राची एकमेव संशोधनसंस्था करून तिची प्रगति कशी होईल याची सदैव काळजी सर्वांनी वाहावी. नको असलेली माणसें आज आहेत, उद्या नाहीत; पण संस्था आपली व चिरकाल टिकून राहणारी. तेव्हा नानासाहेबांनी आपलें नेहमीचें मोठें मन या कामींच संकुचित करूं नये, व महाराष्ट्रांत ही नवीन एक फूट पाडूं नये, अशी त्यांना आग्रहाची विनंति आहे.

शेवटीं पुन्हा, रावबहादूर नानासाहेब सरदेसाई यांना परमेश्वर दीर्घायुरारोग्य देवो व त्यांच्या करवीं इतिहाससाहित्यांत अधिकाधिक भर पाडो, अशी आमची त्याजवळ प्रार्थना आहे.

× × × ×

महाराष्ट्राची गळचेपी—अनेक वर्षांच्या तपश्चर्येचें फळ पावलें; व लहान–थोर, जहाल–मवाळ पक्षभेद विसरून लोकसत्तेच्या भागीरथीचें स्वागत करण्यास सिद्ध झाले. काल ज्यांचीं मस्तकें धुळींत लोळविलीं जात होतीं ते लोकमान्य झाले, राजमान्य झाले, राज्यकर्ते झाले.

या घटनेकडे आशेने पाहणाऱ्या अनेकांस वाटलें की, आता छिन्न झालेले प्रान्त अेक होतील; मातृभाषांस विश्वविद्यालयांचीं लेणीं चढतील; शिक्षणक्रम सुलभ होअील; सरकारी रोषाच्या गुहेंत लुप्त झालेलें वाङ्मय पुन्हा नवजीवन धारण करील; काळाच्या अुदरांतील तेजस्वी रत्नें अुजेडांत येतील; कारावासांत जन्मलेलें प्रभावशाली साहित्य लोकादराच्या प्रांगणांत बावरूं लागेल; भाषणस्वातंत्र्य, लेखनस्वातंत्र्य, व मुद्रणस्वातंत्र्य यांच्या भक्कम बैठकीवर स्वराज्याचें मंदिर अुभें होअील.

परंतु राज्यशकटाच्या अनोळखी दोऱ्या सांभाळण्याचें, स्वराज्याच्या या आधारांचें राज्यकर्त्यांस विस्मरण झालें. कर्जांत बुडालेला सिंध व दुष्काळाने गांजलेला ओरिसा स्वतंत्र झाला. आंध्र देशास व कर्नाटकास अलग स्वातंत्र्याचीं अभिवचनें मिळालीं.

ज्या महाराष्ट्राने परकीय आक्रमणाशीं दुर्दम्य झुंज दिली तो महाराष्ट्र मात्र स्वतःच्या देशांत पोरका ठरला. त्याच्या साम्राज्याच्या वास्तुनगरीचें, मानाचें स्थान हिरावून घेण्याचे डाव सुरू झाले. महाराष्ट्र विद्यापीठाचा तोंडाशीं आलेला घास अक्षम्य दुर्लक्ष्याने अुडविला गेला. महाराष्ट्राचें तेजस्वी वाङ्मय, अंधारांतच पडून राहिलें.

अुलट मुद्रणनिर्बंधाच्या परप्रणित बडग्यास सत्य–अहिंसेच्या अेकांगी कल्पनेची मूठ बसविली जाऊन तो आमच्याच नियतकालिकांच्या पाठींत बसूं लागला आणि अनेक विषयांच्या माऱ्याने छातीस पोक आलेल्या आमच्या बालकांवर परप्रांतांतील भाषा सक्तीने लादण्याचें सुरू झालें.

स्वराज्यांतच सुराज्यांची गळचेपी झाली. लोकसत्ते, तुझी धन्य असो!

मो. ज्ञा. शहाणे

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
महाराष्ट्र साहित्य परिषद

महाराष्ट्र विद्यापीठ

मुंबआी विधिमंडळाच्या यंदाच्या पावसाळी अधिवेशनांत महाराष्ट्र विद्यापीठासंबंधाने श्री. शि. ल. करंदीकर व पंतप्रधान ना. खेर यांजमध्ये खालील प्रश्नोत्तरें झालीं :

श्री. करंदीकरः— महाराष्ट्र विद्यापीठाच्या स्थापनेबद्दल अेका निनांवी दात्याने मोठी देणगी देअूं केली होती या बातमीकडे सरकारचें लक्ष गेलें आहे काय? असल्यास या बाबतींत सरकारने काय केलें? या बाबतींतील पत्रव्यवहार असेंब्लीपुढे ठेवण्यांत येअील काय?

ना. खेरः— गेल्या जानेवारी महिन्याच्या मध्याच्या सुमारास मि. आर. डी. सेठना यांच्या सॉलिसिटरनी ना. प्रधानांकडे अेक पत्र पाठवून पुणें येथे महाराष्ट्र विद्यापीठ स्थापन करण्याला कांही अटींवर दहा लक्ष रुपयांची देणगी देण्याचा मि. सेठना यांचा विचार आहे असें कळविलें. या बाबतींत मि. सेठना यांच्या सॉलिसिटरबरोबर सरकारचा पत्रव्यवहार चालू असतांना मि. सेठना हे जूनमध्ये अेकाअेकीं मरण पावले व संकल्पित देणगीचा प्रश्न आपो-आपच रद्द झाला. हा पत्रव्यवहार असेंब्लीपुढे ठेवण्याचा कांही अुपयोग होणार नाही असें सरकारला वाटतें.

श्री. करंदीकरः—मि. सेठना यांच्या सॉलिसिटरकडून जानेवारींत पत्र आल्यावर ते मरण पावेपर्यंत सरकारने वेळ कां व्यर्थ घालविला?

ना. खेरः—या बाबतींत सरकारने वेळ मुळीच व्यर्थ घालविला नाही.

श्री. करंदीकरः—मग येवढा वेळ सरकार काय करीत होतें?

ना. खेरः—राज्यकारभार. (हंशा)

श्री. करंदीकरः—राज्यकारभार! व पश्चात्ताप करीत होतें ना?

ना. मावळणकरः—ऑर्डर ऑर्डर!

श्री. मंडलीकः—सरकारने या बाबतींत दिरंगाअी कां केली?

ना. खेरः—दिरंगाअी मुळीच झालेली नाही. सरकार पत्रव्यवहार वगैरे गोष्टी करीत होतें.

श्री. करंदीकरः—अितर गोष्टी कोणत्या?

ना. खेरः—मुलाखत, चर्चा, विचारविनिमय वगैरे.

श्री. नरीमनः—मि. सेठना यांच्या मालमत्तेच्या अेक्झिक्युटरकडे सरकार कां विचारणा करीत नाही?

ना. खेरः—या बाबतींत सरकारला कायदेशीर हक्क नसल्यामुळे आपण होअून सरकारला कांही करतां येत नाही. कोणीं मध्यस्ती केली किंवा कांही मार्ग सुचविला तर सरकार विचार करील.

श्री. मंडलीकः—या देणगीच्या अटी काय होत्या?

ना. खेरः—(१) सरकारने महाराष्ट्र विद्यापीठाची योजना दात्याच्या संमतीने अंमलांत आणणें व त्यासाठी योग्य ती तरतूद करणें. (२) विद्यापीठाची घटना व नियम तयार करणें. (३) विद्यापीठाच्या स्थापनेसाठी जरूर तो कायदा करणे.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
महाराष्ट्र साहित्य परिषद

परिषद्वार्ता

[चिटणीसाकडून]

कार्यकारी मंडळ:—ता. २४ जुलै १९३८ रविवारीं भरलेल्या सभेंत कै. दादासाहेब खापर्डे व कै. लक्ष्मणराव फाटक यांच्या मृत्यूविषयी खालील दुखवट्याचे ठराव करण्यांत आले:—

(१) वऱ्हाडचे सुप्रसिद्ध वयोवृद्ध पुढारी, रसिक, विद्वान, विनोदपटु व 'सहजवक्ते' श्रीमंत गणेश श्रीकृष्ण, अर्थात् दादासाहेब खापर्डे, बी. ए., एलूएल्. बी., यांच्या निधनाने जुन्या पिढींतील एक थोर महाराष्ट्रीय अस्तंगत झाले याबद्दल महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या कार्यकारी-मंडळाला अतिशय दुःख व हळहळ वाटत असून आपली ही सहानभूति त्यांचे ज्येष्ठ चिरंजीव श्री. बाबासाहेब खापर्डे यांस निवेदन करण्याचा अधिकार ही सभा कार्याध्यक्षांस देत आहे.

(२) हैदराबाद (द.) येथील 'निजामविजय' पत्राचे संपादक श्री. लक्ष्मणराव फाटक यांच्या अकाली निधनाबदल महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या कार्यकारी मंडळास अत्यंत दुःख होत आहे. अतिशय बिकट व प्रतिकूल परिस्थितींत दक्षिण हैदराबाद येथे 'निजामविजय' हें एकटेंच मराठी साप्ताहिक अत्यंत चिकाटीने, स्वार्थत्यागपूर्वक व अनेक अडचणीस तोंड देऊन त्यांनी अनेक वर्षे चालवून मराठी भाषेची व महाराष्ट्रसमाजाची बहुमोल सेवा केली आहे. त्यांच्या चिरंजीवांस झालेल्या दुःखामध्ये हें मंडळ सहभागी आहे. प्रस्तुत ठराव अध्यक्षांनी त्यांच्या चिरंजीवांकडे पाठवावा.

या सभेंत गेल्या संमेलनांत झालेल्या ठरावांची अंमलबजावणी करण्यास निरनिराळ्या उपसमित्या नेमण्यांत आल्या.

ता. २५ सप्टेंबर १९३८ या दिवशीं भरलेल्या सभेंत खालील ठराव करण्यांत आला:—

धार संस्थानचे प्रसिद्ध इतिहाससंशोधक श्री. काशीनाथ कृष्ण लेले, जोधपूर कॉलेजचे विद्वान प्राध्यापक श्री. श्रीपाद बळवंत ताटके, धाडसी आणि स्वार्थत्यागी वृत्तपत्रव्यवसायी श्री. पांडुरंग महादेव भागवत, राष्ट्रीय शिक्षणप्रेमी श्री. न. ल. आठवले व लघुलिपिसंशोधक श्री. दाबके यांच्या निधनामुळे मराठी भाषेची हानि झाली आहे. त्यांच्या नातेवाईकांस होणाऱ्या दुःखांत ही सभा सहभागी आहे. प्रस्तुत ठराव नातेवाईकांकडे पाठवावा.

गेल्या साधारण सभेंत साहित्यपत्रिका मासिक करण्याविषयी झालेल्या ठरावान्वये एक उपसमिति नेमण्यांत आली होती. या उपसमितीने खालीलप्रमाणे केलेल्या शिफारशींस कार्यकारी मंडळाने मान्यता दिली:—

(१) पत्रिका जानेवारी १९३९ पासून मासिक करण्यांत यावी. पत्रिकेचा सध्याचा आकार त्याचप्रमाणें टाइप पुढे चालू ठेवावेत. प्रत्येक अंकाचे ३ फॉर्म (२४ पृष्ठें) असावे. अंक महिन्याच्या १ ल्या तारखेस वाचकांच्या हातीं पडेल अशा बेताने प्रसिद्ध करावा.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
महाराष्ट्र साहित्य परिषद

(२) उत्पन्नाच्या दृष्टीने जाहिरातीहि घेण्यांत याव्या, परंतु त्या मजकूर छापला असेल त्या पानात किंवा मजकुराच्या पानांच्या मध्यंतरी केव्हांहि छापूं नयेत. औषधांच्या जाहिराती नाकाराव्या. तूर्त सिनेमाच्याहि जाहिराती घेऊं नयेत. बँका, विमा कंपन्या, पुस्तक-विक्रेते, शाळा, कॉलेजें व इतर संस्था, निरनिराळ्या खेळांचीं उपकरणीं, यंत्रें, साबण इत्यादी-च्या जाहिराती स्वीकारण्यास अडचण नसावी.

साहित्यपत्रिका आता मासिक करण्यांत आल्यामुळे जानेवारी १९३९ पासून साधारण सभासदांकडून टपालखर्चाबद्दल कांहीच आकार न घेतां परिषदेची वर्गणी रु. ३ मात्र घेण्यांत यावी असें सभेने ठरविलें.

संमेलनः—

पुढील संमेलनाची व्यवस्था करण्याच्या दृष्टीने वाङ्मयोपासक मंडळ, अहमदनगर, या संलग्न संस्थेने दसऱ्याच्या सुमारास नागरिकांची जाहीर सभा बोलाविली होती. या संमे-लनाच्या अध्यक्षासंबंधी सूचना करण्याची शेवटची तारीख १७ डिसेंबर १९३८ ही आहे. तरी परिषदेच्या सभासदांनी या तारखेच्या आंत कार्यालयाकडे सूचना पाठवाव्या.

संमेलन ठराव अम्मलबजावणीः—

जप्त झालेल्या पुस्तकांवरील बंदी उठविण्याविषयी गेल्या संमेलनांत झालेल्या ठरावान्वयें पूर्वीचेंच शिष्टमंडळ ना. गृहमंत्री यांजकडे ता. १२ सप्टेंबर १९३८ या दिवशीं गेलें होतें, या शिष्टमंडळाने सूचना मांडल्या त्या अशाः—

(१) अद्याप न तपासून झालेल्या ग्रंथावरील बंदी उठविण्यांत यावी;

(२) प. वा. शि. म. परांजपे व बॅ. विनायकराव सावरकर यांचीं पुस्तकें शक्य तितक्या लवकर पुनः तपासून त्यांच्यावरील बंदी उठविण्यांत यावी, कारण ते अभिजात वाङ्मय आहे.

(३) आक्षिप्त ग्रंथांची यादी पुरविण्यांत यावी.

(४) यापुढे कोणतेहि ग्रंथ आक्षिप्त ठरवितांना त्यांतील आक्षेपार्ह भाग दिग्दर्शित कर-ण्यांत यावा; व

(५) छापील यादींतील नं. ३, ३८, ४५, ५६ व ११५ या ग्रंथांकडे ताबडतोब लक्ष देण्यांत यावें.

शिष्टमंडळाच्या मागण्यांना उत्तर देतांना गृहमंत्री ना. मुनशी म्हणाले की,

(१) बाकीचीं पुस्तकें शक्य तितक्या लवकर तपासून घेण्याची सरकार व्यवस्था करील.

(२) आक्षिप्त ग्रंथांबाबतच्या सरकारी पत्रकाचें उल्लंघन न होईल अशा रीतीने परिच्छेद नं. ३ मधील ग्रंथ पुनर्मुद्रित करण्यांत आल्यास अशा सुधारून छापलेल्या आवृत्तीवरील बंदी उठविण्याच्या प्रश्नाचा विचार करण्यांत येईल. मात्र या सुधारून पुनर्मुद्रित केलेल्या आवृत्ती-मुळेहि सरकारी पत्रकाचें उल्लंघन होतां कामा नये.

(३) आक्षिप्त ग्रंथांची समग्र यादी गुप्त असल्याने ती पुरवण्याची मागणी मान्य करतां येत नाही.

(४) ही सूचना प्रत्यक्ष कशी अमलांत आणतां येईल याबद्दल मला शंका वाटते. तथापि ती मान्य करतां येण्यासारखी आहे किंवा कसें याबद्दल विचार करीन.

(५) पांचव्या मागणींतील पुस्तकें लवकर तपासण्याची मी व्यवस्था करीन. दुसऱ्या एखाद्या लेखकाने व प्रकाशकाने इतर आक्षेपार्ह ग्रंथांचे आक्षेपार्ह भाग वगळून पुनर्मुद्रण

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
महाराष्ट्र साहित्य परिषद

केल्यास त्यांच्या बाबतींतहि दुसऱ्या परिच्छेदांत नमूद केलेलीच पद्धति अवलंबण्याच्या प्रश्नाचा विचार करण्यास मी तयार आहे.

२. नाटक करण्यास निरनिराळे परवाने मिळविण्याऐवजी सबंध प्रांतासाठी म्हणून एकच परवाना देण्यांत यावा अशा अर्थाचा ठराव गेल्या संमेलनांत झाला. असाच ठराव पुण्यास गेल्या मे महिन्यांत भरलेल्या भारतनाट्यसंमेलनांत केला. ता. २८ सप्टेंबर १९३८ या दिवशीं या दोन्ही संस्थांच्यातर्फे एक संयुक्त शिष्टमंडळ श्री. मामा वरेरकर यांच्या नेतृत्वाखालीं ना. गृहमंत्री यांच्या मुलाखतीस गेलें होतें. ना. गृहमंत्री यांनी शिष्टमंडळाचें म्हणणें ऐकून घेउन केलेल्या मागणीचा सहानुभूतिपूर्वक विचार होईल असें आश्वासन दिलें.

इतरः— परिषदेच्या परिक्षांस बसूं इच्छिणाऱ्या उमेदवारांसाठी परिषदेच्या कार्यालयांत खालीलप्रमाणे व्याख्यानें ठेवण्यांत आलीं:—

तारीख	विषय	व्याख्याते
२५-८-१९३८	'विचारविलास'	प्रो. वा. म. जोशी
१-९-१९३८	,,	,,
५-९-१९३८	भाषाशास्त्र	श्री. ना. गो. चापेकर
९-९-१९३८ १०-९-१९३८ ११-९-१९३८	आधुनिक मराठी कविता	प्रो. शं. के. कानेटकर
१२-९-१९३८	भाषाशास्त्र	श्री. ना. गो. चापेकर
१३-९-१९३८	'इतिहासमंजिरी'	प्रो. द. वा. पोतदार
१४-९-१९३८	'भाऊसाहेबांची बखर'	प्रो. द. वा. पोतदार
२६-९-१९३८ ते ३०-९-१९३८	'सुलभ अलंकार'	प्रो. के. ना. वाटवे

श्री. ना. गो. चापेकर यांचीं 'भाषाशास्त्र' या विषयावर आणखीहि कांहीं व्याख्यानें व्हावयाचीं आहेत.

चर्चेचा नवीन उपक्रमः— अगदी अलिकडे प्रसिद्ध झालेल्या पुस्तकांवर मोकळ्या मनाने सर्वांगीण चर्चा होऊन निस्पृहपणें सामुदायिक अभिप्राय जाहीर करावा या उद्देशाने चर्चेचा नवीन उपक्रम आरंभिला आहे. ता. १६ सप्टेंबर १९३८ या दिवशीं सुप्रसिद्ध साहित्यिक श्री. वि. स. खांडेकर यांच्या लेखणींतून उतरलेला 'हिरवा चाफा' या कादंबरीवर कार्यालयांत श्री. न. चिं. केळकर यांच्या अध्यक्षतेखालीं दोन तास चर्चा झाली. या नवीन उपक्रमाचा उद्देश व विस्तार निवेदन केल्यावर श्री. दा. न. शिखरे यांनी १ तास भाषण करून चर्चेचा उपन्यास केला. त्यानंतर श्री. पां. वा. गाडगीळ, श्री. य. रा. दाते, श्री. ग. ब. ग्रामोपाध्ये, श्री. नातू (मनमोहन), कु. सुशीला ढवळे वगैरेंनी चर्चेंत भाग घेतला. यांशिवाय प्रो. के. ना. वाटवे, श्री. नी. श. नवरे, श्री. कृ. गो. मराठे, श्री. वि. ना. दीक्षित वगैरे परिषदेचे सभासद उपस्थित होते. चर्चेंत सर्वसाधारण मत पुढीलप्रमाणे दिसून आलें:—

'दोन ध्रुव' या कादंबरीपेक्षा 'हिरवा चाफा' या कादंबरीची रचना अधिक कौशल्यपूर्ण, जास्त चित्तवेधक व एकसंध झालेली आहे. वाचकांना ओढ लावून ती शेवटपर्यंत टिकविण्याचें

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
महाराष्ट्र साहित्य परिषद

यश कादंबरीकाराला लाभलेलें आहे. मनोहर-केशर यांच्या उपकथानकाने जरूरीपेक्षा जास्त जागा व्यापली आहे. कथानकाच्या दृष्टीने पाहतां कादंबरी शोकान्त होणें स्वाभाविक व अधिक परिणामकारक झालें असतें. अगतिक झालेल्या मध्यमवर्गाचें चित्रण विजयच्या रूपाने उत्कृष्ट-पणें रेखाटलें आहे. मात्र समाजवादाची बैठक मुळीच साधलेली नाही. कदमप्रमाणेच कादं-बरीकाराचाहि समाजवाद उथळ शब्दांवर (slogans) आधारलेला दिसतो. कादंबरीचें सारें वातावरण नेहमीप्रमाणे प्रणयप्रधानच आहे आणि समाजवादाचें केवळ सिंचन केलेलें आहे. गॉर्कीप्रमाणे तें समाजवादाने कोंदलेलें नाही. नायक हा समाजवादी नेता तर नाहीच पण मजुरांचा पुढारी किंबहुना उदात्त वर्तनाचा नागरिकहि दाखविलेला नाही ! मोलकरणीचा मुलगा म्हणून त्याला येणारे विशिष्ट अनुभवहि कथन केलेले नाहीत. आपद्ग्रस्त तरुणीशीं त्याने कामांधतेने लगट करणें हें पुढारीपणालाच काय पण सभ्यपणालाहि सोडून आहे. त्या प्रसंगीं त्याने संयम राखला तोहि दुसरीविषयीच्या प्रेमभावनेनेच. कादंबरीकाराला समाज-वाद मांडावयाचा असेल तर त्याचा तत्त्वग्राही अभ्यास त्याने केला पाहिजे, व मजुरांच्या राहणीशीं स्वतःचा साक्षात् संबंध आणिला पाहिजे. केवळ भरतीच्या लाटेकडे कौतुकाने व भीतीने पाहणें लेखकाला पुरेसें नाही.

भाषा मनोहर व उपमा आल्हादक आहेत. कोटि व कल्पकता यांचें उत्कृष्ट प्रदर्शन आहे. मात्र या सर्व शब्दसंपत्तीची "समान वांटणी" करणें अयोग्य आहे. मोलकरणीपासून डॉक्टरणीपर्यंत सर्वांनी समान कृत्रिमतेची भाषा वापरणें अनुचित होय. आपल्या कल्पकतेचें दान लेखकाने 'देशे काले च पात्रे' करावें. मनोहर-सुलभेच्या भेटीसारख्या रसोत्कट प्रसंगींहि हे शाब्दिक खेळ वेदःकार चालू असतात. स्वभाववर्णनासाठीहि शब्दालंकारच वापरले आहेत. 'सर्वाभ्यें अक्षतान् समर्पयामि' या मंत्राप्रमाणे रसासाठी, स्वभावासाठी सर्वत्र अलंकारच वापरले आहेत हें इष्ट नाही. कलेकवादी प्रो. फडके यांनी बोधवाद स्वीकारून लिहिलेली 'समरभूमि' व बोधवादी श्री. खांडेकर यांनी 'प्रेमाराधन' करून लिहिलेली 'हिरवा चाफा' या कादंबऱ्या जुळ्या बहिणींसारख्या परस्परसदृश वठल्या आहेत

यापुढील बैठकींत 'तुटलेले दुवे' या पुस्तकावर चर्चा होईल. नक्की तारीख मागाहून प्रसिद्ध करण्यांत येईल.

नवीन सभासद

हितचिंतक

१ श्री. बहिनीसाहेब विंचुरकर, पुणें

तहहयात

२ श्री. केशवराव अप्पा पाध्ये, मुंबई
३ ,, गणेश चिंतामण तांबे, इंदूर
४ ,, महादेव दामोदर गाडगीळ, हैदराबाद (द.)
५ डॉ. शंकर वामन हर्डीकर, हैदराबाद (द)
६ ले. क. खंडेराव गणपतराव घारपुरे, पुणें

साधारण

मुंबई

७ श्री. विठ्ठलराव शिवलिंगु आलकोंडे
८ ,, श्रीपाद रामचंद्र टिकेकर
९ रा. ब. भास्करराव विठोजीराव जाधव
१० श्री. शमुवेल दयाराम बेल
११ श्री. केशव भिकाजी ढवळे
१२ प्रो. रघुनाथ धोंडो कर्वे

वाई

१३ श्री. कृष्णाजी गंगाधर अभ्यंकर
१४ डॉ. दत्तात्रय नारायण गोखले

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
महाराष्ट्र साहित्य परिषद

सातारा

१५ डॉ. मोरेश्वर नारायण आगाशे

१६ श्री. पंढरीनाथ वामन घाणेकर

१७ श्री. खंडेराव माधव खंडागळे

इंदूर

१८ श्री. वासुदेव वामन ठाकूर

सुरत

१९ श्री. सदाशिव गोविंद बर्वे

हैद्राबाद (द.)

२० श्री. गोविंद तात्याजी अक्कलकोटकर

कारवार

२१ श्री. मारुती अनंत पै

पनवेल

२२ श्री. एकनाथ सीताराम गोरे

पुणे

२३ प्रो. श्रीपाद महादेव माटे

२४ श्री. रामचंद्र जनार्दन गोखले

२५ प्रो. त्र्यंबक भिकाजी हर्डीकर

२६ प्रो. पुरुषोत्तम गणेश दाणी

२७ प्रो. कृष्णाजी रामचंद्र जोग

२८ रा. सा. पुरुषोत्तम सीताराम वैद्य

२९ डॉ. विष्णु सीताराम सुकथनकर

३० श्री. प्रभाकर वामन वर्तक

३१ श्री प्रभाकर रघुनाथ सिधये

३२ श्री. गणेश वामन जोशी

३३ भि. केशव रामचंद्र कानिटकर

३४ श्री. विनायक महादेव लिमये

३५ श्री. श्रीपाद वामन काळे

३६ श्री. वीरेश्वर त्र्यंबक चितळे

३७ श्री. पुरुषोत्तम दामोदर कान्हेरे

३८ रा. सा. महादेव काशिनाथ कारखानीस

३९ श्री श्रीपाद रामचंद्र माटे

४० श्री. रामचंद्र हरि माने

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
महाराष्ट्र साहित्य परिषद

जाहिरातींविषयी सूचना

जानेवारी १९३९ पासून पत्रिकेच्या अंकांत जाहिराती घेण्यांत येतील. पत्रिकेचा वाचकवर्ग कोणत्या दर्जाचा आहे हें सांगावयास नको. प्रत्येक सभासद, संलग्न-संस्था, वाचनालयें, शाळा, कॉलेजें इत्यादि वर्गणीदारांकडे पत्रिका पाठविली जाते जाहिरातींच्या दराविषयी खालील पत्त्यावर पत्रव्यवहार करावा :—

चिटणीस, महाराष्ट्र साहित्य परिषद्,
टिळक रस्ता, पुणें २.

सभासदांस सूचना

जानेवारी १९३९ पासून पत्रिका मासिक करण्यांत आली असून वार्षिक वर्गणी रु. ३॥ ऐवजी रु. ३ ठेवण्यांत आली आहे.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
महाराष्ट्र साहित्य परिषद

महाराष्ट्र साहित्य पत्रिकेचीं पहिलीं आठ वर्षें

अर्थात्

पत्रिकेच्या अंकांचीं वर्षशः बांधलेलीं आठ पुस्तकें

दर पुस्तकांत अभिप्राय, अैतिहासिक, चरित्र, निबंध, पुस्तकपरीक्षण, भाषिक शंकाचर्चा, सामाजिक अित्यादि विषयवार सदरें असून, सर्व मिळून महाराष्ट्र-भाषा, वाङ्मय, समाज, अितिहास यांसारख्या विविध क्षेत्रांतील नवीन विद्वत्ताप्रचुर विचार आणि माहिती मिळणार आहे.

किंमत— सुंदर कापडी बांधणी विषयसूचीसह दर वर्षाच्या पुस्तकास ४ रुपये; परिषदेच्या सभासदांस २ रु. ट. ख. निराळा.

वि. सू.— नवव्या व दहाव्या वर्षांच्या पुस्तकांच्याहि बांधीव प्रती तयार आहेत. परंतु या प्रतींस प्रत्येकीं ४ रुपये पडतील.

चिटणीस, म. सा. परिषद्.

‘मराठी भाषेचा व वाङ्मयाचा अितिहास’

महानुभावअखेर

सदर ग्रंथ म. सा. परिषदेने मुद्दाम बक्षीस देअून लिहवून घेतला आहे. प्रसिद्ध साहित्यिक कै. **बाळकृष्ण अनंत भिडे** यांच्या सुरस लेखणींतून तो अुतरला असल्यामुळे त्याविषयी जास्त गौरवपर लिहिण्याची जरुरी नाही. विषयाच्या महत्त्वामुळे सदर ग्रंथ शाळा, कॉलेजें, वाचनालयें, महाराष्ट्रसाहित्य व भाषाभक्त या सर्वांनी अवश्य संग्रह करण्याजोगा आहे. पुस्तकाचा आकार रॉयल अष्टपत्री, पृष्ठें १२५, अुत्तम बांधणी, किंमत फक्त अेक रुपया. परिषदेच्या सभासदांस व वर्गणीदारांस बारा आणे. ट. ख. वेगळा.

विशेष माहितीसाठी लिहा:—

चिटणीस,

म. सा. परिषद्, टिळक रस्ता, पुणें २

आर्यसंस्कृति मुद्रणालय, चिमणबाग, टिळकरस्ता, पुणें, येथे लक्ष्मण नारायण चाफेकर यांनीं छापिलें व पुणें येथे महाराष्ट्र-साहित्य-परिषदेच्या कार्यालयांत परिषदेकरिता ना. गो. चाफेकर यांनी प्रसिद्ध केलें.

अनुक्रमणिका

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

महाराष्ट्र साहित्य परिषद

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
महाराष्ट्र साहित्य परिषद